१६४५३

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा० वा०
दा. क्र. १६४५३

IRBK-0116453
IRBK-0116453

विकास

प्रकाशन

कोल्हापूर

IRBK-0116453

IRBK-0116453

पंडित गुरव

# आई

## आगामी प्रकाशने :

एक गरिबा तुझी कहाणी !

तिसरी आवृत्ती

सोनचाफ्याची फुले

तिसरी आवृत्ती

भाऊबीज


तिसरी आवृत्ती

चांतुणा

दुसरी आवृत्ती

मान्यवर शिक्षण संस्था, शाळा, हायस्कूलम...

पुरवणी वाचनार्थ व बक्षीसासाठी मंजूर झालेली



## मातृ प्रेमाची मंगल गाथा

# आई

[illegible] गुरव

प्र का श क :
सौ. शांताबाई गुरव
विकास प्रकाशन
मंगळवार,
कोल्हापूर–२

चौथी आवृत्ती
गणेशचतुर्थी
सप्टेंबर १९७५

मु द्र क :
गो. बा. कुलकर्णी
सेवा मुद्रणालय
१६७ बी वॉर्ड,
विद्यापीठ मार्ग,
कोल्हापूर.

ज्यांनी मला वाङ्मय म्हणजे काय हे
माहित नसतांना माझे हातून त्याची
पहिली ' श्री ' काढण्यास उद्युक्त
केले व वेळोवेळी दिलासा दिला त्या—

—गुरुवर्य

**सी. स. सरपाटील**

यांच्या चरणी—



# आईचा मुलगा

ज्यानी आपल्या "आई" बद्दल हे लिहिले ते पंडितराव गुरव एक साधे कामगार आहेत. मनुष्य समाजातील कोणत्याही थरातील असो त्याची प्रतिभा त्याला केव्हांही पुढें आणल्याशिवाय राहात नाही. परिस्थितीनें श्री. पंडितरावाना फारसे शिक्षण घेंता येणे शक्य झाले नसले तरी त्यांच्या अंतरिची तळमळ इतकी जोरदार आहे कीं चांगल्या साहित्यिक गुणामध्यें त्यांच्या या कृतीचा समावेश करावा लागेल.

"आई" हीं पुस्तिका छोटीशी असली तरी गुणानी ती मोठी आहे. मुलीच्या मृत्यूपासून त्या कुटुंबातील झालेली स्थित्यंतरे, 'आई' चा झालेला हळुवार जीव याचे मनोज्ञ चित्रण श्री. पंडितरावांनी मोठ्या जिव्हाळ्याने केले आहे. आई वडिलांच्या स्वभावरेखा त्यामध्यें ठळकपणे दिसतात.

मनुष्य जन्मतो त्याच्यापूर्वीच त्याचे शिक्षण सुरू झालेले असते. बालक जन्मापूर्वीच आईबापांनी आपापल्या जीवनांत जे विचार केले असतील, ज्या भावना हृदयात खेळविल्या असतील, त्या सर्वातूनच नवबालकाच्या शिक्षणाचे धडे तयार केले जात असतात. मुलाच्या आयुष्याचा बराच भाग आईबापांच्या सहवासाशी निगडीत असतो.

यावरून वरील कलाकृतीचे मूल्यमापन करावे लागेल. यामध्यें उपमा, अलंकार वगैरे थाटमाट नसेल. पण आपली आई अगदी साध्या कपड्यात असली, तिच्या अंगावर गुंजभरही सोने नसले तरी मुलाला तिच्या नजरेत हिरेमाणिक मिळतात. आणि मुलगा श्रीमंत होत असतो.

श्री. पंडितराव गुरव यांचे हे पुस्तक-त्याच दृष्टीनें मूल्यवान आहे.

श्री. गुरव यांना पुढील वाङ्मयाकृतीमध्यें असेच यश लाभो.

— र. वा. दुसधनीस
बी. ए. ( ऑनर्स ),
जी. डी. सी.

# पुरस्कार

श्री. पंडित गुरव यांनी लिहिलेल्या "आअी" या पुस्तकांत त्यांनी त्यांच्या मातेच्या सहवासांतील आठवणी ग्रथित केल्या आहेत. अुत्कट मातृप्रेमांतूनच श्री. गुरव यांना या आठवणी लिहिण्याची स्फूर्ती झाली असल्यामुळे त्यांच्या पुस्तकांत त्यांना आअी संबंधी वाटत असलेले प्रेम, जिव्हाळा व आदर याचे शब्दचित्र त्यांनी परिणामकारकरित्या व्यक्त केले आहे. त्यांच्या "आअी" या प्रकाशनाच्या व्दितीय आवृत्तीस मी सुयश चिंतितो व त्यांच्या हातून अधिक वाङ्मय सेवा घडो अशी अिच्छा व्यक्त करतो.

(यशवंतराव चव्हाण)

## तिसऱ्या आवृत्तीचे निवेदन–

"आई" पुस्तकाची तिसरी आवृत्ती रसिक वाचकांना सादर करत आहे. माझ्या या पुस्तकाचं अमाप कौतुक झालं. मान्यवर साहित्यिकांपासून तो सामान्य वाचकांपर्यंत सर्वांनी त्याचे स्वागत केले.

"आई" हे पुस्तक एका उदात्त अशा भावनेनं लिहिलेल एक मातृस्मृतीचित्र आहे. मला लहानपणापासून आईचा विलक्षण लळा लागून राहिला होता. तो इतका कीं, त्याची खात्री या पुस्तकाच्या वाचनानंतर आपणांस येईलच. माझी आई, मी तिची आठवण कधींच विसरू शकत नाहीं. आजही ती माझे दृष्टीत, जिवंत आहे! तिचा आशीर्वादाचा हस्त माझे माथी सदैव ठाकलेला आहे! मी माझ्या आईचा परमभक्त आहे. त्या भक्तीच्या प्रेरणेतूनच "आई" हे पुस्तक लिहिलं गेलं. हे पुस्तक बाजारी वृत्ती ठेवून काढण्यांत आलेलं नसून त्याच्या पाठीशी भावनेचा ओलावा, अंतरीची तळमळ ही मूर्त स्वरूपांत असलेली दिसून येतील. मी ज्या एका विशिष्ट भावनेला प्राधान्य देवून हे पुस्तक लिहिलं त्या भावनेचे वाचक यथोचित स्वागत करतील अशी आशा आहे.

–पंडित गुरव

## चौथ्या आवृत्तीचे दोन शब्द–

आज गणेशचतुर्थीच्या शुभदिनी 'आई' पुस्तकाची चौथी आवृत्ती आपल्यापुढे सादर करत आहे.

मराठी भाषिक आमजनता व मान्यवर शिक्षणसंस्थांतून या पुस्तकाला उदंड मानमान्यता मिळत गेली. परदेशांत विखुरलेल्या मराठी बांधवांनीहि हे पुस्तक आस्थेनं हाताळल. सर्वांच्याकडून त्याचं कोडकौतुक झालं.

या सगळ्यांच्या सदिच्छा, सद्भावना आणि आशिर्वाद सतत पाठीशी राहावेत ही कृतज्ञतेची आशा या शुभप्रसंगी करत आहे.

आपला सर्वांचा

कोल्हापूर
८–९–७५

–पंडित गुरव

१५४५३

— १ —



व्यायलेली गाय आपल्या पुढ्यांत बागडणारें गोंडस पाडस पाहून क्षणार्धापूर्वीच्या वेदना विसरून, त्या जीवंत दौलतीला पाहतांच हरकून जाते! अगदीं असंच स्त्रीचहि असतं नाहीं? मी तर ऐकतोंय कीं स्त्रीचं पहिलं बाळंतपण म्हणजे मरणच असतं! आणि त्यांतून जी स्त्री सुखासुखी पार पडते तो तिचा पुनर्जन्मच होय!

भरल्या संसारांत खरी रंगत कशानें चढत असेल तर छोट्या छबकड्या बाबा लोकांमुळें! त्यांच्यावांचून असलेला संसार म्हणजे जीव नसलेला देह! बेसूर बासरीच जणूं!

आमच्या कुटुंबांत माझे जन्माअगोदर एक मुलगी होती– माझी आक्का. मुलगी नाकीडोळी सरस, रंगानं गोरी-गोरी आणि विलक्षण चलाख. त्यामुळें साहजिकच ती सर्वांची फार आवडती होती. तिला पाह्यलं कीं आपल्याकडे घ्यावं असा मोह पाहणाऱ्यास चटकन् व्हायचा.

पण अशा या सर्वांना आवडणाऱ्या, हव्याशा वाटणाऱ्या मुलीचा सहवास आम्हांस लाभू देण्यास दैवाची तयारी नव्हती ! माझी ती आक्का कांही एका आजारांत सांपडून, त्यांतच क्रूर दैवाच्या स्वाधीन झाली ! त्यानंतर आमच्या घरांत दुसरी आक्का कांहीं मला मिळाली नाहीं. आजतागायत मी बहिणीचा भिकारीच राह्यलो आहे ! आणि माझी आक्का? तिच्या ऐकीव स्मृतींतच मनाचं सांत्वन करतों आहे.

आक्कानें या मृत्यूलोकांतून प्रयाण केले. तिच्या त्या जाण्याने माझे आईचे मनावर विलक्षण परिणाम झाला ती बेभान बनली ! स्वतःला विसरली ! तिचा मेंदू काम देईनासा झाला ! ती घटकेंत शुद्धींत तर घटकेंत बेशुद्धींत हवं ते बरळू लागली. तिच्या डोळ्याचे अश्रू कधीं थांबत ना ! घटकेघटकेला आपल्या आक्काच्या आठवणी ती काढी व स्वतःशीच त्या मोठमोठ्यानें बडबडे. एखादे वेळीं मोठमोठ्यानें सार घाली; ‘ आक्का ग, हा पाह्यलास ‘ ह्यांनीं ’ तुला खाऊ आणलाय्. नकोय् का तुला तो? अग ऽ ऽ आक्का ! ’

गल्लीतील सारी मंडळी हळहळली, 'अरेरे, गेली बिचारी जन्मांतून. बिघडलं बिचारीचं डोकं!'

या साऱ्या घडणाऱ्या घटनांमुळें घरांतील कोणाचेच लक्ष स्थिर नव्हतें. कुणीहि पुरता विचार करावयाच्या मनःस्थितींत नव्हते.

आईची वेडाची अवस्था पाहून वडीलहि मोठेच चिंताग्रस्त बनले होते. इथं आपल्या जातबांधवांत राहून, आपल्यातला हा गोंधळ रोज चालू ठेवणं त्यांना बरं वाटत नव्हतं. शेवटीं त्यांनीं विचारानें ठरवून टाकलें कीं, आपण आपले पंढरपूरास जावें, त्यांच्या धार्मिक मनोवृत्तीस, तेथील धार्मिक वातावरणांतील भावी यशाचा साक्षात्कारच झाला जणूं!

वडिलांनी आपला हा मनोदय, आमचे भाऊबंद व वडिलांचे घरोब्यांतील गाढ स्नेही, श्री. शंकरराव गुरव यांच्याजवळ सांगितला. ते म्हणाले, "इथं राहून 'हिची' तब्येत सुधारेल असं कांही वाटत नाही; तेव्हां चद्रभागेच्या वाळवंटांत तरी जाऊन पाहतों; त्या विठ्ठलास कांहीं दया येतेय कां?"

माझ्या आक्काचे बरोबरीची-अगदी आक्काची दुसरी प्रतिमाच अशी, शंकर मास्तर यांची मुलगी इंदू ही होती. इंदू आणि आक्काचे लाड एका मोजमापानें आजवर आमच्या घरांत झालेले होते! आणि इंदूवर आक्काइतकाच आई व वडिलांचा जीव जडलेला होता. पण किती झालं तरी इंदू ही

दुसऱ्याच्या पोटी जन्मलेली होती! मग तिच्यावर प्रेम सांगण्याचा तिसऱ्यास काय अधिकार ?

आई व वडील जाण्यास निघाले. सारी बांधाबांध झाली. आणि ती बसकडे जावयास निघाली. गल्लींतील मंडळी त्यांना निरोप देत चार पावलें पुढें आली होती. त्याच वेळी शंकर मास्तर इंदूचा हात वडिलांच्या हातीं गुंतवत, मोठ्या गंभीर स्वरांत म्हणाले, ' बाबूराव ! आज तुमची आक्का मेली नसून, इंदूच मेली आहे असं समजा. आणि माझे इंदूलाच आक्काताई समजून तुमचेपाशीं ठेवा. आजपासून इंदू माझी नसून ती तुमची आहे !' त्यांच्या भाषेंत मूर्तिमंत त्याग दिसून येत होता.

' दुसऱ्याच्या संसारांत दिलासा देणेसाठीं स्वतःचं लेकरूं देणाऱ्या त्या शंकरमास्तरांची धन्य-धन्य होय !' पुढें कित्येक वर्षेपर्यंत तरी ही इंदू आमच्या आईजवळच होती. माझ्या आईनें तिला स्वतःचं मातृत्व देऊन लहानाचें मोठें केलें. त्या वेळची एक गोष्ट मला वडिलांनीं सांगितली होती.

इंदू आणि आक्का या दोघी सर्वांच्या दृष्टीनें जुळ्या बहिणीच ठरवल्या गेल्या होत्या. ही एका व ती दुसऱ्या आईची असेल अशी कल्पनाच नाहीं व्हायची कुणाची ! आणि त्याला तसं सबळ कारणहि असायचं. प्रत्येक गोष्ट दोघींच्या बाबतींत सारखी असल्यामुळें शंका येणंच अशक्य होतं. त्या वेळीं वडील रोज संध्याकाळी इंदू व आक्कास फिरावयास नेत असत.

वडिलांचा पोषाख हा अगदीं मामुली आणि साधा असे. या दोघींना मात्र ते चांगले कपडे, पायांत पायमोजे बूट वगैरे घालून, मोठ्या राजस बनवून नेत असत.

फिरून येते [illegible] नेमानें त्या दोघींना घेऊन, महालक्ष्मीच्या दर्शनास जा[illegible]ांतील पुजाऱ्यांना या कुणी थोराघरच्या मुली आहेत, अस[illegible]टून ते त्यांना रोज कांहीं ना कांहीं प्रसाद म्हणून खाऊ देत.

एकेदिवशी वडील बधल्या वेळेंत, आका व इंदूला न घेतां एकटेच महालक्ष्मीच्या देवालयांत गेले. ते देवीचें दर्शन घेत असतांना, तेथील पुजाऱ्याचें त्यांचेकडे लक्ष गेलें. तो त्यांना बोलावून म्हणाला, ' काय रे, आज मुलींना नाहीं आणलंस ? थोडं थांब हं !' आणि आंतून कुंकूं लावलेला नारळ व अंगारा घेऊन येत म्हणाला, ' हा नारळ प्रसाद म्हणून घेऊन जा. बाईसाहेबांना सांग देवीच्या पुजाऱ्यांनी तो दिलाय म्हणून.' वडील त्या प्रकाराने चांगलेच आश्चर्यांत पडले. पण बोलले मात्र कांहीच नाहीत. नारळ हातीं घेतला व ' बरं सांगतो.' असे म्हणून तेथून चालते झाले.

असो. या दुःखित अवस्थेंत असतांनाच ' शंकरराव ' यांनी स्वाधीन केलेल्या इंदूला घेऊन त्यांनी पंढरपूरचा मार्ग धरलेला होता. वडील पूर्वापार विठ्ठलभक्त होते. त्यांची वर्षांतून एक दोनवेळ पंढरपूरास फेरी होतच असे. वडिलांप्रमाणें आईहि

दुसऱ्याच्या पोटी जन्मलेली होती! मग तिच्यावर प्रेम सांगण्याचा तिसऱ्यास काय अधिकार?

आई व वडील जाण्यास निघाले. सारी बांधाबांध झाली. आणि ती बसकडे जावयास निघाली. गल्लींतील मंडळी त्यांना निरोप देत चार पावलें पुढें आली होती. त्याच वेळी शंकर मास्तर इंदूचा हात वडिलांच्या हातीं गुंतवत, मोठ्या गंभीर स्वरांत म्हणाले, 'बाबूराव! आज तुमची आक्का मेली नसून, इंदूच मेली आहे असं समजा. आणि माझे इंदूलाच आक्काताई समजून तुमचेपाशीं ठेवा. आजपासून इंदू माझी नसून ती तुमची आहे!' त्यांच्या भाषेंत मूर्तिमंत त्याग दिसून येत होता.

'दुसऱ्याच्या संसारांत दिलासा देणेसाठीं स्वतःचं लेकरूं देणाऱ्या त्या शंकरमास्तरांची धन्य-धन्य होय!' पुढें कित्येक वर्षेपर्यंत तरी ही इंदू आमच्या आईजवळच होती. माझ्या आईनं तिला स्वतःचं मातृत्व देऊन लहानाचें मोठें केलें. त्या वेळेची एक गोष्ट मला वडिलांनीं सांगितली होती.

इंदू आणि आक्का या दोघी सर्वांच्या दृष्टीनें जुळ्या बहिणीच ठरवल्या गेल्या होत्या. ही एका व ती दुसऱ्या आईची असेल अशी कल्पनाच नाहीं व्हायची कुणाची! आणि त्याला तसं सबळ कारणहि असायचं. प्रत्येक गोष्ट दोघींच्या बाबतींत सारखी असल्यामुळें शंका येणंच अशक्य होतं. त्या वेळीं वडील रोज संध्याकाळी इंदू व आक्कास फिरावयास नेत असत.

वडिलांचा पोषाख हा अगदीं मामुली आणि साधा असे. या दोघींना मात्र ते चांगले कपडे, पायांत पायमोजे बूट वगैरे घालून, मोठ्या राजस बनवून नेत असत.

फिरून येते वेळीं नेमानें त्या दोघींना घेऊन, महालक्ष्मीच्या दर्शनास जायचें. देवळांतील पुजाऱ्यांना या कुणी थोराघरच्या मुली आहेत, असं वाटून ते त्यांना रोज कांहीं ना कांहीं प्रसाद म्हणून खाऊ देत.

एकेदिवशी वडील मधल्या वेळेंत, आका व इंदूला न घेतां एकटेच महालक्ष्मीच्या देवालयांत गेले. ते देवीचें दर्शन घेत असतांना, तेथील पुजाऱ्याचें त्यांचेकडे लक्ष गेलें. तो त्यांना बोलावून म्हणाला, 'काय रे, आज मुलींना नाहीं आणलंस ? थोडं थांब हं !' आणि आंतून कुंकूं लावलेला नारळ व अंगारा घेऊन येत म्हणाला, 'हा नारळ प्रसाद म्हणून घेऊन जा. बाईसाहेबांना सांग देवीच्या पुजाऱ्यांनी तो दिलाय म्हणून.' वडील त्या प्रकाराने चांगलेच आश्चर्यांत पडले. पण बोलले मात्र कांहीच नाहीत. नारळ हातीं घेतला व 'बरं सांगतो.' असे म्हणून तेथून चालते झाले.

असो. या दुःखित अवस्थेंत असतांनाच 'शंकरराव' यांनी स्वाधीन केलेल्या इंदूला घेऊन त्यांनी पंढरपूरचा मार्ग धरलेला होता. वडील पूर्वापार विठ्ठलभक्त होते. त्यांची वर्षांतून एक दोनवेळ पंढरपूरास फेरी होतच असे. वडिलांप्रमाणें आईहि

विठ्ठलाची भक्ती करायची. तीहि चारदोन वेळ पंढरपूरला जाऊन आली होती. पंढरीच्या त्या भक्तीमय वातावरणाची मोहिनी तिलाहि पडली होती! आणि म्हणूनच वडिलांनी तिला आपल्या दुःखाचा विसर पडावा. घरातील वातावरणांत तिच्या मनांत सतत घोळणाऱ्या दृश्यांचा विसर पडून, तिचे मन वेगळ्या वातावरणांत रमवावे या हेतूनेच, त्यांनी तिला पंढरपूरला न्यावयाचे ठरवले होते.

## — २ —



स्टेशनवर तिकीट मास्तरच्या हाती तिकीट देऊन, पंढरपूर शहरच्या हद्दीत पाऊल टाकतांच, वडिलांनी एक मोठा सुटकेचा निःश्वास सोडला आणि स्वतःशीच बोलले, 'विठ्ठल! विठ्ठल!'

वडिलांचे पंढरपूरास वरचेवर जाणे असल्यामुळे, त्यांना तेथील बडव्याचे घरहि माहिती झालेले होते. आणि हे बडव्याचे घरी गेले, तेव्हा तो स्वतः घरीच होता. यांना सहकुटुंब आलेले पाहून त्याला आश्चर्य वाटले. तो वडिलांना म्हणाला, 'किती दिवसांनी हा दुर्मिळ योग जुळून आला आहे. पण यायच्या अगोदर सूचना तरी धाडायची कीं नाहीं ?'

मग वडलांनीं त्यास एकंदर परिस्थितीची कल्पना दिली. म्हणाले, 'यापुढं इथे आमचा बेमुदत मुक्काम व्हायचा आहे!'

'कांहीं हरकत नाहीं. विठ्ठल कृपेनं आपलं चांगलंच होईल हे निश्चीत!' तो बडवा म्हणाला.

आतां दोन दिवस होऊन गेले होते. आईचें मन येथील वातावरणांत विलक्षण रमलें गेलें होतें. तिची तब्येतही सुधारत असल्याचें दिसून येत होते. वडलांना आपण विठ्ठलाच्या नगरींत येऊन राहिल्यानंतर,आपल्या पत्नीस बरें वाटूं लागलें या गोष्टीचें मनोमन समाधान वाटलें. आणि अगोदरच विठ्ठलचरणी लीन असलेले त्यांचे मन जास्तच त्याच्या भजनीं लागलें!

रोज पहाटेच्या काकड आरतीला, आई वडील जात असत. पहाटेंच्या त्या शांत वातावरणांत. विठ्ठलाच्या देवळांत चाललेली भगवत्-नामस्मरणाची विविधस्वरी गुंजनावळ, किती आल्हाद-दायक वाटत असायची. आईहि त्या भगवत्-नामस्मरणांत तल्लीन होऊन,एखादा चरण म्हणायचा प्रयत्न करायची. किती दिवस झाले? किती गेले? याची पर्वा कुणीच केली नव्हती! फक्त वडिलांना मात्र त्याची फिकीर वाटायची. ते कंठलेला प्रत्येक दिवस लक्षांत ठेवत. त्या सर्वांची बेरीज त्यांनीं मनांत बांधून ठेवलेली होती!

आज पंढरपूरास येऊन बरोबर एक महिना झालेला होता. वडील अगोदरच परक्याच्या घरांत राहावयाच्या विरोधी

असल्यामुळें; अगदीच नाइलाज म्हणून ते आजवर इथं राहिले होते. केवळ पत्नीच्या प्रकृति स्वास्थ्यासाठीच ते आजवर गप्प होते.

पूर्वीच्या मानानें आईची तब्येत आतां सुधारल्याचें दिसतांच, वडीलांनीं पंढरपूरहून निघावयाचे ठरवलें! त्यानी आपला हेतू त्या बडव्याजवळ सांगितला. आणि म्हणाले, ' माझ्यासाठीं आपल्यांतील मंडळींना खूप त्रास झाला आहे. या उपकाराची फेड केवळ कृतज्ञतेशिवाय, दुसऱ्या कशानें मी करूं शकणार?'

तो बडवा वडिलांना म्हणाला, 'आपण असं कांहींच मनांत आणूं नये. खरी विठ्ठलाची मर्जी. त्याची इच्छा म्हणूनच हें सारं घडलेलं आहे. आम्हीं काय, केंवळ नाममात्र आहोंत! सारा करता करविता तो!'

जायच्या दिवशी काकडआरतीस बडव्यानें विठ्ठलाच्या गळ्यांतील हार, अंगारा आणि नारळ आईचे ओट्यामध्यें घातला. व आईला म्हणाला, 'हा विठ्ठलाचा प्रसाद मी आपणास देत आहे. त्याची रोज नेमानें पूजा करत जा. आणि पुढच्या वेळीं बाळाला विठ्ठलाचे पायावर घालायलाच घेऊन या!'

त्याच्या आशीर्वादाने आईचें मन हर्षानें फुलून गेलें! ती आनंदानें बेहोष होऊन बोलली, ' मला मुलगा व्हावा. त्याचे नांव मी पांडुरंग ठेवीन. आणि इथं येऊन, विठ्ठलाचे दारात पेढे वाटीन!'

पंढरपूरच्या त्या नारळाची घरच्या देवाबरोबर रोज पूजा व्हायची. आई रोज भक्तिभावानें त्या नारळाच्या पाया पडून म्हणायची, ‘ बा, विठ्ठला, कधीं दिलेलं वचन पुरं करशील ? किती माझा अंत पाहशील ? ’


—थोड्याच दिवसांत आईची ती करुण हांक विठ्ठलाच्या कानीं गेली ! आईच्या भक्तिभावाला परमेश्वर प्रसन्न झाला. आईला दिवस गेले ! आणि ती गोष्ट कळतांच सारं घर आनंदानं बेहोष झालं. खूप खूप आनंदांत बुडालं !

नऊ महिने नऊ दिवस भरले. आणि...आणि....पौर्णिमेचं चंद्रग्रहण सुटून, पांच मिनिटं होतात न होतात, तोच एक नवा बालकावतार झाला ! बंद झालेल्या दरवाजापलीकडून मुलाच्या रडण्याचे स्वर सर्वांच्या कानीं जाऊन आदळले ! वडिलांनीं तर आनंदानें दरवाजाकडे धांवच घेतली. पाहतात तो दरवाजास आंतून कडी !

—पण सुईनबाईच आंतून मोठ्यानं बोलली, ‘ जा–जा–पेढे आणायला पाठवा कुणाला तरी अगोदर ! ’

♣ ♣ ♣

— ३ —



वडिलांनी मुलाचं पहिल्यानें तोंड पाहिलं! त्या इवल्या नाजूक जीवाला; वडिलांचा गार हात लागतांच कांहीं आगळीच जाणीव झाली! आणि ते मूल मोठ्यानं रडूं लागले! 'टॅऽऽह्यॉं–टॅऽऽह्यॉं!' वडील मनांहि मन हंसले व म्हणाले, 'बेटा, आत्तापासूनच बापाचा हात लावून घ्यायला तयार नाहींस कीं काय?'

'पुरें तें तुमचं बोलणं!' आई फणकारून लटक्या रागानं बोलली. 'एवढासा लहान जीव तो काय आणि त्याच्यावरून पुढील परीक्षा केलीत?'

वडिलांच्या चेहऱ्यावर छद्मी हास्य पसरले. त्यांचे डोळे सैरभैरपणें आईच्या सर्वांगावर फिरले. नुकतंच सुईणीनें गरम पाण्यानें तिला स्नान घातले होते. आणि त्यामुळेच तिचा गौरवर्णीय असलेला रंग पाण्याच्या गरमपणानं लाल लाल दिसूं लागलेला होता. तिच्या चेहऱ्यावर सततच वास करून असलेलं स्मित हास्य, आताहि चोरपावलांनी प्रतीत होत होतं. तिच्या किंचित् लांबट वाटणाऱ्या चेहरेपट्टीला शोभेसं पण थोडं मोठं वाटणारं नाक! परंतू त्याच्या मोठेपणास हरवणारं गुबगुबीत गालहि कांही कमी महत्वाचे नव्हते हे खास! तिचे डोळे म्हणजे शुभ्र लोण्याचा गोळाच जणूं! नजर जितकी मायाळू तितकीच क्रोधावस्थेत राकट–करडी–वाटायची! तिची शरीरयष्टि बांधेसूद नव्हती! ती अंगाने स्थूलदेही होती, पण तिचा हा स्थूलपणाच तिच्या सौंदर्याला साजेसा वाटायचा. आणि ती...

परंतु वडिलांची तंद्री इथंच भंग पावली. दारांतून पोस्ट-मनने त्यांना हांक मारली व दारांत पत्र टाकले. पंढरपुराहून त्या बडवे मित्राचे त्यांना अभिनंदन व आशीर्वादाचे पत्र मिळाले होते. त्यांनी ते पत्र आईला वाचून दाखविले. तिला देखील आनंद वाटला. त्या मानस बडवे दिराचे मनोमन आभार मानले तिने.

आज दहावा दिवस होता. बारशास फक्त उद्यांचाच एक दिवस मध्ये होता. वडिलांची कोण धांदल उडून गेलेली होती.

आतांपर्यंत त्यांनी लांबच्यांना पत्रानें, जवळच्यांना तोंडाने आणि घरच्यांना हक्कानें आग्रहाची निमंत्रणे दिलेली होती. आचारी वाढपे हे आणि ते....या साऱ्यांची जमवाजमव त्यांना वेळेत करायची होती. त्यांना काम जास्त होतं आणि वेळ थोडा राह्यला होता !

अखेर एकदां तो बारशाचा दिवस उगवला ! सकाळच्या शांत प्रसन्न वातावरणांत सनईच्या मंजूळ नादलहरी कांही आगळीच लज्जत आणूं लागल्या. पाकगृहांत आचाऱ्यांची गडबड, धडपड चालू झाली. पोरटारहि त्यांतच मधून-मधून रडारड करून, त्या वातावरणाला एक वेगळा साज चढवूं लागली.

गांवोगांवच्या आलेल्या पाहुण्यामंडळींची व्यवस्था चांगल्या प्रकारे ठेवणेंत आलेली होती. गल्लींत तर सर्वांना निमंत्रणे होतींच होतीं. पण त्यांतूनहि कुणी कुठलाहि आगंतुक जरी आला तरी, त्यालाहि विनाभोजन सोडायचं नाहीं, अशी वडलांची सक्त ताकीद होती सर्वजण आप-आपल्या कामामध्यें गुंतलेले होते. सारा कारभार गडबडींत–धडपडींत चाललेला होता. आणि विशेष गोष्ट ही कीं, एवढा व्याप सोसूनही साऱ्या वातावरणांत एक प्रकारचा जोश उल्हास दिसून येत होता.

सर्वांची जेवणें व्यवस्थितपणें आटपलीं. आचारी मंडळीहि स्वतःचीं जेवणें पुरीं करून, मग आपल्या सामानाच्या


आवराआवरीस लागली. पाहुण्यांपैकी कोणी फिरावयास तर कोणी आपल्या मंडळींना भेटायला गेले होते.

सकाळपासूनचा गडबड-गोंधळ नाहींसा होऊन आतां एक प्रकारची शांतता नांदूं लागल्याचं दिसून येत होतं.

संध्याकाळीं साधारण सहा ते सातच्या दरम्यान पाहुणे, मित्रमंडळी आणि शेजारी यांच्या भेटी यावयास सुरवात झाली. सोन्याचांदीच्या दागिन्यांपासून तो लोखंडाच्या पाळण्यापर्यंत विविध तऱ्हेच्या विविध वस्तू अनेकांनीं आणल्या होत्या. त्या वेळचा कोल्हापूरचा बँड वादनकार म्हणून 'झक बाबू' (हेंही त्या वेळचेंच पेटंट नांव) ही व्यक्ति प्रसिद्ध होती. स्वतः 'वाईकरांनीं' त्याला आमचे दारीं बँड वाजविणेस पाठवले होते. 'वाईकर' हे जातीनें ब्राह्मण असले, तरी त्यांचा आमच्या वडिलांचेवर विलक्षण लोभ होता. त्यांनीं अनेक नडल्या अडल्या वेळेस वडिलांना धीर दिलेला आहे. आम्हां भावांच्या मुंजीहि स्वजातींतील इतर ब्राह्मण मुलांच्या बरोबरीनें करून दिलेल्या आहेत. त्यांनीं आम्हांवर केलेले उपकार आम्ही कधींच विसरणार नाहीं खास!

पाळणा म्हटला गेला. आणि पाळण्यांत मुलाचे नांव, तो पांडुरंग कृपेनें झाला म्हणून–'पंढरीनाथ' असें ठेवलें. पुढे थोड्या दिवसांत पंढरीचा पांडुरंग झाला आणि आज त्याचा 'पंडित' बनलेला आहे!

- ४ -



ज्यांच्या घरांमध्यें कुठच्या एका वस्तूची मुबलकता असते, त्याच्याविषयीं तो सदाचाच बेपर्वा असतो-बेफिकीर असतो. हीच वस्तुस्थिति त्या वेळीं आमच्या घरची होती. मी जन्मास आल्यापासून कांहीं वेगळेंच असें आनंदायक वातावरण आमच्या घरांत दिसून येऊं लागलें होतें. माझे आईची प्रकृति आतां पूर्णतया बरी झालेली होती. तिचं सारं अंतःकरण, सारं प्रेम, माझ्यावर केंद्रित झालं होतं! माझे हट्ट पुरविण्यांत आणि मटामट पापे घेऊन हिंदोळे घालण्यांत तिचे दिवस कसे झद्झद् निघून जात होते.

मी हट्टानं मागितलेली एखादी वस्तू वडिलांनीं आणण्यास टाळाटाळ केलीं कीं, नानाप्रकारें हट्टवाद करून ती त्यांना आणावयास लावावयाचीच. त्या वेळेस वडील रुसलेल्या आईस थोड्या रागानेंच म्हणत, “ जणूं जगांत न घडणारी गोष्ट आपल्यांत घडलेली आहे ! फक्त आपल्यालाच देवानं मूल दिलंय् जणूं ! तीं जगांमध्यें दुसऱ्या कुणास होतच नाहींत कीं काय ? म्हणून त्या चिल्लाळाची कामना पुरी करणेसाठीं या यशोदामाई आमचा प्राण खाताहेत ! ”

इतकं बोलून कांही क्षणांचा अवधि जात असेल नसेल, तोंच ते स्वयंपाकघरांत शिरत. आईच्या कुशीतील बाळास आपल्याकडे ओढून घेत घेत म्हणत, “पंडितऽऽचल आपण भूऽऽऽ फिरायला जाऊं ! खाऊं हवाय् ना रे तुला ? हात् गुलामा ऽ ऽ ! आणि असे म्हणून वेडावत गालगुच्चे घेत, बाहेर घेऊन येत.

त्या वेळी आमची आर्थिक परिस्थिति बेतास बात होती. म्हणजे खाऊन पिऊन सुखी होतो एवढंच ! वडील कुठे नोकरी न करतां घरचेच देव ( आम्हांस पुजारी या नात्याने कांही देवांचे वडिलार्जित वार मिळालेले आहेत ते ) संभाळत असत. वडिलांचे वडील हे त्यांच्या लहानपणींच वारले होते. त्यांची आई मात्र आजहि जवळ जवळ वयाच्या सत्तरींत आरोग्यसंपन्न व काटक राहिलेली आहे. जगांत सासू-सुनेच्या बाबत भांडणाचा जो प्रवाद आहे तोहि आमचे घरांत दिसून येत असावयाचा. आमच्या आईचें व आजीचें कधीं म्हणून पटत

नसायचें आणि विशेष म्हणजे त्यांच्या या भांडणाचें मूळ कांहीं या घटकेपर्यंत कुणाला सांपडलेलें नाहीं! असो. लहानगा पंडित मात्र त्या वेळीं सर्वांचा जीव कीं प्राण होता. जणूं काय, तो म्हणजे एक अमूल्य अशी विधात्याची ठेवच! घरांतील मंडळीप्रमाणें बाहेरचीहि मंडळी, त्याचे लाड करत असत. त्यांना त्याचे विषयीं काय इतकं आकर्षण वाटायचं न कळे? त्याला घेण्यासाठीं त्यांचा हात चटकन् पुढें न होईल तरच नवल! त्यांचा तो पुढें आलेला हात आणि चेहऱ्यावर प्रगट होणारे विविध हावभाव पाहून, त्याला त्यांची खूपच गंमत वाटायची. तो मनोमन खूष व्हायचा आणि असा कांही हंसायचा कीं बस्स! त्याची पकड लोकांवर पडली नाहीं तरच नवल! मग मात्र पापे घेणे वगैरे इतकं व्हायचं कीं कांहीं पुसूं नये. मुकाट्यानं हे सारं सहन करावं लागे त्याला!

मला दूध पाजवतांना अगर कांही खावयास बसलो असतांना कुणी परकं माणूस आलेलं, माझ्या आईला मुळीसुद्धां खपत नसायचं. याबाबतीत सुरुवातीपासूनच खबरदारी घेऊ लागल्यामुळे, आसपासचे शेजारीसुद्धा त्या वेळेत येत नसत. परंतू अशाच एका वेळेची गोष्ट......

वडील कामास्तव कुठें बाहेर गेलेले होते. आईनें जेवण आटपलें होतें. पाळण्यात सकाळीं झोंपल्यापासून मी अगदीं गप्प पडून राह्यलो होतो. मध्यें एक दोन वेळ जाग आली होती.

पण वेळींच आईनें झोंके घालून परत शांत केलं होतं ! शेवटीं माझ्या पोटांतील क्षुधादेवीनें मला जागे केलें. मी जागा होऊन पाळण्याला टांगलेल्या चित्रविचित्र कापडी चिमण्यांच्या हालचाली टक लावून पाहूं लागलों. मध्येंच गंमतीनें खिदळून, डावा पाय दोन्ही हातांच्या पकडींत पकडून, खुदकन् हंसत होतो. तर कधीं हातपाय जोरजोरानें हालवून, सारा पाळणा हादरून सोडत होतों. जणूं साऱ्या पृथ्वीचं अधिपतित्वच हस्तगत करायची धडपड करत होतों ! ...

बारा वाजले. वडीलांचा पत्ता नव्हता. आई सारं जेवण आटोपून त्यांचीच वाट पाहूं लागली होती. ते आले नाहीत. तोंपर्यंत मुलांस दूध तरी पाजवावें असा विचार करून ती. पुढील दारीं वळली. वडील आले तर त्यांना कडी काढणेस, पुनः यावयास नको म्हणून, नुसतेंच दार पुढे ढकलून ती आंत आली.

वाटींत दूध घेतलें. चमचा घेतला. आणि मला आपल्या मांडीवर उताणा निजवून, माझे मुखांत दुधाचा चमचा घालणेंस सुरुवात केली. असा कांहीं वेळ गेला असेल नसेल, तोंच पुढचें दार उघडल्याचा आवाज झाला. तिला वाटलं ‘ हेच ’ आले वाटतं, ती आपली तशीच दूध पाजवूं लागली आणि ती आपल्या तंद्रींत असतांनाच, तिला पुढील शब्द ऐकायला मिळाले. ‘ ऐकलंत का लक्ष्मीबाई ? मला तुमच्यांतला शेर पाहीजे आहे. मी इथें केव्हांची उभी आहे. पण तुमचं लक्ष इकडे


जाईल तर ना? म्हटलं, बघूंया तरी स्वारीचं केव्हां लक्ष जातंय तें....'

'हे पाहा... तुम्हांला या वेळी इथं यायची काय जरूर होती? दुसऱ्याच्या मुलाला पाजवत असतांना ते पाहात राहणं तुम्हांला शोभतं तरी कसं? आतां माझ्या मुलाला कुठचं आलंय हे दूध पचायला!'

आईचे बोलणे सहन न होऊन, त्या दुसऱ्या बाईनेहि मोठ्यानं भांडावयास सुरुवात केली.

नुकतच बाहेरून घरांत पाऊल टाकत असलेल्या, वडिलांना आपल्या बायकोचे हे भांडण मिटवतांना, नाकी नऊ आले. कौरव-पांडवांच्या भांडणांतील शिष्टाईइतकाच त्रास पडला!

हे भांडण सोडवून चोहोंकडे शांतता नांदतांच, वडिलांनी सुटकेचा निःश्वास सोडला. आणि ते स्वतःशीच हरीनाम घेत राहले; 'विठ्ठल-विठ्ठल!'



— ५ —

सुखाच्या दृष्टीनं पाहायला गेलं तर घरांतील सर्वांत मीच जास्त सुखाचा वाटेकरी झालेलो आहे. लहानपणी आईच्या अंगावरील दुधाबरोबर, गायीचे दूधहि भरपूर प्रमाणात मला मिळालेले आहे. शिवाय ग्लुकोज,ओव्हलटाईन यांसारखी अनेक शक्तीवर्धक बिस्कीटे, आणि पदार्थ मला भरपूर मिळाले आहेत. त्या खाण्याचे मीहि योग्य प्रमाणांत चीज करून दाखवलेले आहे. इतका चांगला खुराक खाऊन काडीपैलवान न राहता सशक्त, बांधेसूद, लोकांना चटकन् दिपवील असा पैलवान गडी बनलो आहे!

मी दीड वर्षांचा झालो असेन नसेन, तो आईच्या पोटांत माझ्या मधल्या भावाने, आपले स्थान पटकावले. त्या वेळी माझे आईची तब्बेत चांगली, सुदृढ, आरोग्यपरिपूर्ण, होती.

आतां आईचे पोटांत दुसरे बाळ वाढूं लागल्यामुळें, मला आईने अंगावर पाजवणेचे बंद करावे, म्हणून इतरांनी सल्ला दिला. पण नेहमीच्या संवयीनें त्यांचा तो रूढ प्रतिबंध पाळणें ही मोठी अवघड गोष्ट होती ! आणि शेवटी तसंच घडलं. त्यांच्या त्या म्हणण्यास परिस्थितीने आईला बगल द्यावी लागली. माझ्या अतिरेकी हट्टाने आईने मला अंगावर पाजवले. आणि त्याचा परिणाम व्हायचा तोच घडून आला.

थोड्याच कालांत मला चिक लागला ! (हा रोग पोटांत गर्भ वाढत असतांना,मुलांस अंगावर पाजवल्यानें होत असतो.) थोड्याच दिवसांत सशक्त अन् गुटगुटीत दिसणारा पंडीत काटकुटीप्रमाणें वाळूं लागला ! त्याच्या सुदृढ-सुडौल प्रकृतीला उतरती कळा लागली. शौचास जास्त प्रमाणांत व्हावयास लागले. शौचाला सारखे व्हायला लागले म्हणजे, माणसाची शक्ती कमी व्हायला अवधी कितीसा लागणार ? थोड्याच दिवसांत भीमाप्रमाणें दिसणारा पंडीत सुदाम दिसूं लागला !

माझे तब्येतीवर हा झालेला विपरीत परिणाम पाहून, आई व वडिलांचें धाबेच दणाणले. आपल्या मुलांवर ओढवलेली ही आपत्ती पाहून, त्यांचा अर्धा प्राणच कुणीतरी घोटत आहे असं

त्यांना वाटलं! काय करूं न् काय नको, कांहींच सुचत नव्हतं! सारींच घाबरीं होऊन गेलीं होतीत.

आई बिचारी! तिला यांतलं कांहीं म्हणून उमजून येत नव्हतं. ती आपली मला कुशीत घेऊन थोपटत पडून राहिली होती. कधीं कधीं माझ्या अंगावरून प्रेमानें हात फिरवत म्हणे, 'माझ्या पंडितारेऽऽ तूं! माझ्या राजा! माझ्या परजा!!' आणि असें बोलत बोलतच, ती माझे इतके मुके घ्यायची कीं शेवटीं मलाच तें सारं असह्य व्हावयाचं! आणि मी मोठ्यानें रडायला सुरुवात करायचो; कीं, मग माझी लगेच तिच्या मुक्यांतून सुटका व्हावयाची! शेजारचे लोक घटके घटकेला माझ्या तब्येतीची चौकशी करत. सगळेंच वातावरण एक प्रकारच्या खिन्नतेनें उदास बनून राहिलेलें होतें.

शेजार पाजारच्या लोकांच्या जाण्यायेण्यामुळें दिवस कसातरी निघून जावयाचा. त्याचं कांहीं घरच्या मंडळींना फारसं वाटायचं नाहीं. पण भयाण रात्र...ती कंठायची म्हणजे अगदीच अवघड वाटायचं! त्या भयाण रात्रींत टिटव्या, पिंगळ्यांचे अशुभ चित्कार मनाला कांहीं वेगळाच भास भासवत असायचे. त्यांच्या त्या भग्न शांततेंतील आवाजानें माणूस असं घाबरून जायचं कीं बस्स! त्या आवाजाच्या रूपानें मृत्यूच त्यांच्यावर झडप घालायला धावला आहे! अशा या कठीण परिस्थितींत घरांत दुसरं कुणीच जागावयास तयार नसायचं. पण आई! तिला कुठचं आलंय स्वस्थ राहवायला! आपल्या बाळासाठीं

ती प्रत्यक्ष मृत्यूशीं झुंज द्यायला हंसत तयार होईल! मग ही तर यत्किंचित् बाब!

आई जणूं डोळ्यांचं निरांजन पाजळून, रात्रंदिवस माझ्या शय्येशेजारी पडून राहिलेली असायची. तिच्या जीवास फक्त एकाच ध्यासानं ग्रासलेलं होतं. आणि तें म्हणजे 'माझ्या पंडीताला केव्हां बरं वाटेल?'


घरीं मला पाहाणेंस येणाऱ्या प्रत्येकाजवळ आई रडून रडून हेंच विचारायची! तिचा कंठ दाटून यायचा. शब्द आंतल्या आंत घुटमळले जायचे. केवळ तिच्या चेहेऱ्यावर अंतर्यामीच्या भावनाच प्रतीत व्हायच्या!

पाहणाऱ्याचं अंतःकरण हेलावून जायचं! आईची ती अवस्था पाहून त्याचं अंतःकरण दयार्द्रतेनं भारावले जाई. आणि पाहणारी व्यक्तीहि आईच्या दुःखात सहभागी होई!

घरांत कुणी बाहेरचे पाहावयास आलें कीं, त्यांच्याजवळ आईनें रडत बसावे. ही गोष्ट वडिलांना कधींच पसंत पडत नसे. ते याबाबत अनेक वेळां आईस प्रेमानें-रागानें समजावून सांगून दमले होते. पण आईचा तो देहस्वभाव कांहीं हटूं शकत नव्हता. तिच्या त्या स्वभावगुणावर त्यांचा कांहीं म्हणून कांहींसुद्धां प्रभाव पडायला तयार नव्हता! अशाच एका रात्रीची गोष्ट...

सकाळपासूनच माझी तब्येत बिघडलेली होती. बेशुद्धीतच पडून होतो. दिवसभर घरांत कुणाचंच चित्त ठिकाणावर

नव्हतं. डॉक्टरना दोन वेळ बोलावून आणलें होतें. त्यांनी एनिमा करून, इंजेक्शन्सहि दिली होती. त्यानाहि आतां माझ्या जगण्याबद्दलची आशा फार कमी वाटूं लागली होती. शेंवटीं जातां जाता, वडिलांना बाजूस घेऊन ते म्हणाले, ' मूल जगणं न जगणं हे तुमच्या नशिबावर अवलंबून आहे. प्रयत्न करायचं आपलं काम. यश देणारा परमेश्वर ! आजची रात्रच धोक्याची आहे. शक्यतों सांभाळा. मी सकाळीं येईनच आणखीन् ! '



शेवटीं दिवस पार पडला ! आणि राहिली रात्र !—काळ-रात्रच जणूं ! आई उशाला बसून होती. वडील गच्चीवर झोपले होते.

रात्रीचे दहा वाजून गेले होते. आजूबाजूची वर्दळ बंद पडून चोहीकडे शांतता नांदू लागली होती. मधूनच रातकिड्यांची किर-किर, त्या साऱ्या शांततेंत व्यग्रता आणत होती. बाकी सारं अगदीं शांत होतं. मधूनच कुठून तरी गिरणीच्या भोंग्यासारखा आवाज ऐकायला आला. पण तोहि चटकन् नाहींसा झाला. पूर्ववत् शांतता नांदू लागली. आईनें डोळ्यांत आलेली झोंप झाडून टाकली! ती खंबीर निर्धारानें माझ्या शेजारीं जागत बसून राहिली होती. घरांतील इतर सर्व मंडळी दिवसभराच्या दगदगीनें थकून जाऊन, गाढ निद्राधीन झालेली होती. ऐन मध्यरात्रीची वेळ! झोपेची झांपड आईच्या डोळ्यांवर पडली. तिचा क्षणमात्र डोळ्याला डोळा लागला! आणि नेमक्या त्याच वेळीं दोन टिटव्या आमच्या घरावर बसल्या, त्यांनी ओरडायला सुरुवात केली. कांहीं पिंगळेहि, तिकडे रंकोबाच्या देवळांतून मोठमोठ्यानें ओरडायला लागले. आणि याच वेळीं शिंक्यावर असलेलं दुधाचं भांडे काळ्या मांजरानं उंच उडी घेऊन खालीं पाडलं! त्या दुधांतले कांहीं थेंब आईच्या अंगावर उडाले! आणि आई खडबडून जागी झाली!

तिची झोप क्षणार्धांत उडाली. आणि तिचं सारं अंग कापरे भरून हलूं लागलं! तिला वास्तवतेचे म्हणून कांहीं भानच राहलें नाहीं. अशा धूंद अवस्थेतच तिनें मोठ्यानें किंकाळी फोडली!

सारी मंडळी खडबडून जागी झाली. वडील रागानें ओरडतच धांवले. ‘काय झालंय ग इतकं ओरडायला तूला?’

‘जरा बघा ना याच्याकडे. बाहेर टिटव्या, पिंगळे ओरडूं लागले आहेत. बाळऽऽअ! पंडिताऽऽ!’ ती रडत रडत भावनावेगानें भारावून जाऊन, मुलाच्या पोटांवरून व गालांवरून हात फिरवत बोलत होती.

वडील झोपमोडीच्या घुश्यांतच फुसकारत! माझ्या अंथरुणां-जवळ टेकले. त्यांनी आपला हात माझे नाकाजवळ नेला. तोंडा-जवळ नेला. परत एक वेळ सर्व अंगावरून फिरवून मागे घेतला. इतकं सारं कांही घडून आलं. पण त्यांच्या तोंडून एक शब्दहि कांहीं बाहेर पडला नाहीं!

आईला राहावत नव्हतें. तिनें त्यांच्या सर्व हालचाली डोळ्यांत प्राण आणून पाहिल्या होत्या. त्या साऱ्या पाहून तिची अंतर्यामीची उत्कंठा विलक्षण वाढली होती. ती त्यांचे चेहऱ्यांवरील भाव पाहून कांहीं ताडतां येतंय कीं काय म्हणून पाहूं लागली. पण तो तिचा प्रयत्न निष्फळ ठरला! अखेर धाडस करून तिनें विचारले, ‘काय म्हणतेय त्याची तब्बेत?’

‘एच्यायला! हरामखोर ...... जरा पडून देखील देत नाहीस माणसाला! हें कारटं काय मरतंय थोडंच?—’ तिच्या प्रश्नाचं हे उत्तर होतं! एकदम धरणीकंप झालेला होता. ती

खालच्या मानेनें फक्त त्यांचे शब्द ऐकून घेत होती. त्यांच्यापुढे ‘ ब्र ’ अक्षरहि काढण्याची तिची छाती नव्हती. तिनं बाजूला वळून आपल्या बालकांकडे पाह्यलं. सुरम्य-निष्पाप असं ते बालक शांत पडून राह्यलं होतं! तिच्या मनानें उचल खाल्ली. ती चटकन् पुढें सरकली. आपल्या बाळाला ती छाया देत होती. कुशींत घेत होती. तिच्या डोळ्यांतून दोन अश्रू टपटप त्या बाळाच्या भालप्रदेशावर ठीबकले. ती एकाग्रतेनें आपल्या बाळाकडे पाहूं लागली होती. जणूं, आपल्या बाळाचा नयन-कुंचल्यांनीं ती आपल्या हृदयाच्या, तसबिरीवर फोटोच उतरवत होती!

◊ ◊ ◊

— ६ —



आकाशांत भ्रमण करणारा सूर्य हा, कधींच कुणाची पर्वा करून हवा तिथें थबकत नसतो. कुणा अमीर उमरावांच्या लालसेनें, आपल्या भ्रमणांत व्यत्यय येऊं देत नसतो. कीं आपल्या कार्यांत यत्किंचितहि हयगय होऊं देत नसतो. हीच गोष्ट कालाच्या बाबतींतहि, आपणांस ग्राह्य मानावी लागेल. कालाचंहि अगदीं असंच असतं. तोहि सारखा पुढंच चाललेला असतो.

मी सर्वांत वडील भाऊ. माझा लहानगा भाऊ आत्तासा कुठं रांगू लागला होता. किती झाले तरी एका आईच्या

पोटांतून बाहेर आलेलीं आम्हीं लेकरं ! आमचा दोघांचा चेहरा एकमेकांशी असा कांहीं जुळावयाचा कीं, तो जर लहानगा नसता तर या दोघांपैकीं कुठचा पंडित अन् कुठचा बाजीराव हें ओळखण्याचा पेचप्रसंगच निर्माण झाला असतां !

माझा तो इवलासा बालगडी भाऊराजा पाहून माझं मन कसं हरखून जायचं. आणि त्याला स्वतः घ्यायला मोठी ओढ घ्यायचं ! पण आमच्या भावना कोण जाणणार ? आई स्वयंपाकगृहांत असे व इकडे बाळानं पाळण्यांत रडावयास सुरुवात केली कीं माझं मन मला कसं बेचैन करून सोडायचं ! मग मी दुड दुड धांवत पाळण्याकडे जाई. शाळेंत जाणाऱ्या मुलांनीं, घरीं म्हटलेल्या कवितेंतील एखादं कडवं, माझ्या बोबड्या बोलांत म्हणून, मी त्याला रमविण्याचा प्रयत्न करी. झोंके घाली. त्याचं रडूं इतकें करूनहि थांबलं नाहीं तर मग मात्र माझा राग विलक्षण चढायचा. मी त्याला कडेवर घ्यायच्या उद्देशानें पाळण्यांत हात घालायचा. आणि त्याच वेळेस स्वयंपाकगृहांतून बाहेर पडलेली माझी आई, मी बाळाला घेण्यासाठीं पुढें होतोय हें पाहातांच संतापानें धांवून यावयाची. माझ्या पाठींत धपूकन धपाटा घालून ओरडावयाची-कारट्या, तूं केवढा, हें मूल केवढं. आणि त्याला घ्यायला धांवतोस होय? चांगला झाला तुझ्याएवढा म्हणजे मग कर तुला हवं तें ! ' इतकें बोलून ती बाळाला अंजारून गोंजारून थोडं वेडावून स्तब्ध बसवण्याचा प्रयत्न करी. पण तो प्रयत्न

यशस्वी झाला नाहीं तर मग, ती त्याला पदराखालीं घेई. मग मात्र लुच्चा कसा गप्प बसून आईचं दूध पिऊं लागे.

मी आतां आजारीपणांतून बरा झालों होतों. माझी प्रकृती पूर्ववत् जरी नसली तरी, सर्वसाधारण का होईना पण बरी होती. घरांत आतां नवं लहान मूल झाल्यामुळें साहजिकच पूर्वीइतके माझे लाड होत नसत. हें जरी खरं असलं तरी मला त्याची जाणीवच कधी झाली नाहीं. घरांत सासूसुनेच्या [ आजी व आईच्या ] भांडणानें भलताच पेच येऊन, त्याचं पर्यवसान वेगळें राहण्यांत झालं होतं. आणि खरा प्रपंचाचा भार अंगावर पडतांच, वडिलांना थोडा त्रास जाणवूं लागला होता. आमच्या घरची परिस्थिती अगदींच गरीबीची नव्हती. तरीपण प्रपंचांतील कर्तबगार पुरुष या नात्यानं, वडीलांना कांहीं हालचाल करणं भागच होतं. त्यांनीं आतां गांवांतील देवळें पूजेसाठीं घेतली होतीं. त्या बरोबर पानें आणून पत्रावळी लावण्याचा जोडधंदा चालू केला होता. हा धंदा वरून पाहाण्यास जरी हलक्या दर्जाचा दिसला, तरी तो विलक्षण किफायतशीर आहे हें खरं. घरची बायकामंडळीहि सहजा-सहजी रोजी रुपया दोन रुपये मिळवूं शकतात.

आमचा प्रपंच अगदी सुखासमाधानानं चालला होता. घरांत दोन बाळं खेळूं लागल्यामुळें, आईवडिलांना विलक्षण आनंद वाटत होता.

मी आतां सहाव्या वर्षांत पदार्पण केलं! माझी आई माझ्याशी पूर्वीइतकीच लाडीगोडीनं वागत होती. चुकलं मुकलं तर, चार दोन रट्टे द्यावयास कमी करत नव्हती. आणि आम्हीहि तितकेंच हट्टखोर! मार खाऊनहि होतों तसेंच राहात होतों. हुंदडत होतों. बागडत होतों. शेजारपाजाऱ्यांचीं मुलें जमलीं म्हणजे त्यांच्या जोडीनें, शाळेंतील कविता गात होतों. त्यांच्याबरोबर ते नेतील तिकडे दूर हुंदडायला जात होतो. आणि घरी–? घरी यायला वेळ लागला कीं, आई अगर वडिलांचा मार खात होतों. निगरगट्ट बनत होतों!

मला माझा नवा भाऊ फार आवडायचा. त्याचे ते इवलेसे हात. त्या हातांची तीं चिमुकलीं बोटं. त्याचं तें इवलंसं नाक. एवढंसं तोंड. सारं सारं कसं नवलाचं होतं!

मी त्याचा इवलासा हात हातांत घ्यावयाचा व म्हणावयाचा, 'बाऽऽळ! आपण भूऽऽर जाऊंया? दूर दूर...दूर!' इतकें बोलतच मी त्याचा चिमुकला हात वर वर नेई आणि त्यावेळीं बाळ माझ्याकडे पाहून खुदकन हंसे. त्यामुळें माझा आनंद द्विगुणित होई.

मी उल्हासानें त्याचा गोड पापा घेई. त्याच्या कानांत आनंदानें 'कुर्र ऽऽऽ!' असा आवाज करी. मग काय! हंसूं लागलेला बाळ लाथा झाडून; हात आपटून रडायला लागे. जोरजोरानें 'टॅंऽऽह्या, टॅंऽऽह्या......' करी. आणि मग मात्र

मला चांगलेंच कांपरे भरे. मी त्याला गप्प बसविण्यासाठीं प्रयत्नांची शिकस्त करी. पण...तेवढ्यांत आईच्या ओरडण्याचा आवाज ऐकूं येई. 'पंड्या! अरे पंड्या ऽऽऽ! लागलास कां छळायला त्याला? काय तरी बाई, इद्रकल्याणी कारटं आहे? जरा कुठें बाहेर जायला काय रे घेशील? थांब तिथेच हं. आलेंच मी!'

पण आमची स्वारी तिथं कुठली थांबायला? मी केव्हांच रंकभैरवाचं देऊळ गांठलेलं असायचं.

'लहान मुलांची मोहिनी किती विलक्षण असते नाहीं? त्याला पाहून आपले कडेवर घ्यावं अशी इच्छा न होईल, तो मानवच कसला......'

माझा भाऊ हा कुणावरहि चटकन् मोहिनी घालण्याइतका सुस्वरूप व मनमोहक असाच होता. त्याला पाहिलं कीं आपल्या-कडे ओढून घ्यायला मन धजावल्याखेरीज रहायचं नाहीं कुणाचेंहि! मला माझ्या त्या भाऊराजाबद्दल कोण अभिमान वाटून रहायचा म्हणून सांगू! कुणी एखाद्यानं माझ्या भावाला आपल्या कडेवर घेऊन म्हटलं, 'पंडित, तुमच्या बाळाला आमच्या घरीं घेऊन जातो.'— तर मला मोठा राग यावयाचा. मीं मोठा घसा काढून रडावयाचा. मग मात्र त्यांना माझी समजूत काढण्यासाठीं कोण कष्ट घ्यावे लागत!

माझ्या या रडव्या स्वभावामुळें वरील घराच्या शेजार-पाजारच्या लोकांना माझ्या बाबतींत तो एक मोठाच विषय

होऊन बसला होता. शेजारचे लोक माझ्या घरीं यावयाचे व मला चिडवीत म्हणायचे, ' पंडित, तुमच्या बाळाला आमच्या घरीं नेतो ! ' आणि मी त्यांच्यावर रागावून धुसफुसायचा. अति झालें कीं, भोकांड पसरून जोरानें रडूं लागायचा.

अशाच एका प्रसंगाची स्मृति मी आपल्यास सांगणार आहे.

बाहेरचा फिरता भार नसलेनें वडील सकाळींच पानें आणण्यासाठीं निघून गेले होते. घरीं आई, मी व लहान भाऊ एवढीच मंडळी होतों. रात्रीचें उरलेलें शिळें जेवणच जेवून वडील गेले होते. आपणास बाहेरून यायला फार वेळ लागणार असें त्यांनीं स्वतः जातांनाच सांगितलें होतें. म्हणून आईने सुरवातीस कांहीं एक न करतां, कुरवाड्यांच्या आलेल्या दोन नैवेद्यावरच गुजराण केली होती. घरचं उष्टं, भांडी वगैरे सारे आटोपून आई रिकामी झाली होती. आम्ही माजघरांत येऊन अंथरुण टाकले होते. त्यावर आई व मी झोपलो होतो. आमचा जरा डोळ्याला डोळा लागतो न लागतो, तोंच बाहेरून कुणाची तरी हांक ऐकावयास आली.

' काकू—ए काकू ग ! ' आमच्या घराशेजारील यादवाच्या वाड्याचे एका भागांत एक मराठ्यांचे कूळ रहात होते. त्यांना तीन मुली होत्या. त्या आमच्या आईला ' काकू ' या नांवानेच हांक मारीत असत. आम्ही त्यांचा आवाज चटकन् ओळखला. माझी आईही मोठ्या स्वरांत म्हणाली,

‘ काय ग आकाताई ? ’

‘ तात्या कुठे बाहेर गेलेत वाटतं ? ’ ती आंत येऊन म्हणाली.

‘ होय, पानें आणण्यासाठीं गेले आहेत. जेवलीस कीं नाहीं ? ’

‘ जेवले. आतांच हात धुतला नि इकडे आले ! ’

त्यांचं आणि आमचं घर एकमेकांशेजारी असलेनें त्यांचे आमच्या घरीं येणें जाणें असायचे. आमच्यांतलं अडलं नडलं कामहि त्या करूं लागत असत. आम्हीहि वरचेवर त्यांना देवाधर्माचं आलेलं अन्न देत असतो. त्यांचा व आमचा मोठा घरोबा होता ! त्यामुळं आतां घरांतून जेवण पार पडल्यानंतर विसाव्याचे चार क्षण, गप्पा झोडून खर्ची घालण्याकरितां आकाताई घरांत आली होती. तिचा नेहमीचाच तो येण्याचा क्रम होता.

आईनें आतां अंथरूण सोडलं. उठून थोडासा आळस दिला. ती माजघरांत असलेल्या डब्यांच्या रांगेकडे वळली. कुठलासा एक डबा तिनें बाहेर काढला त्यांतील धान्य सुपांत ओतून घेऊन तो रिकामा डबा पूर्ववत् ठेवून दिला. त्या धान्यांतून इकडून तिकडून, एक दोन वेळ हात फिरवून ती आकाताईकडे वळून म्हणाली, ‘ आकाताई ! एवढे तांदूळ जरा निवडू लाग ग. त्यांना कसले तांदूळ आणलेले आहेत कीं नाहीं, त्यांत सारे खडेच आहेत बघ ! ’

म. ग्रं. ... ९५४५३ ... वि. ओ. बा.

'बघू तरी कसले आणले आहेत ते!' आक्काताई पुढे होऊन, त्यांतील तांदूळ स्वतःच्या हातांत घेऊन म्हणाली.

'मला तरी काय माहीत. त्यांनी कसले आणलेले आहेत ते! नाही ती पंचाईत कशाला पाहिजे? येतात ना पुढें मग शिजवावयाचे काम तेवढे आपले, बस्स!' आई चटकन् सडेतोड शब्दांत बोलली.

'होय बाई तुझंच म्हणणं खरं आहे.' आक्काताई आईच्या हातांतील सूप घेऊन, ते पांखडत म्हणाली.

आक्काताई तांदूळ निवडूं लागली. आई मुलांचे कपडे (मळकट) धुण्यासाठीं कपड्याकडे पाहूं लागली. माझीहि झोंप आतां पार उडून गेली होती. मी उठून आक्काताईच्या समोर बसून तांदूळ निवडूं लागलो. इतक्यांत आंतून लहान मुलाचा आर्त स्वर आमच्या कानीं पडला. तो रडण्याचा स्वर ऐकून मी चटकन् उठलों. त्या मुलाकडे धावलो. पण मी पाळण्यापर्यंत मजल मारण्याच्या आंतच आईनें नंबर मारला होता! तिनें त्याला उचलून घेऊन शांत करण्यांसाठी आटोकाट प्रयत्न केला. पण तो मुळीच थांबेना. आईने शेवटी त्याला बाहेर आणले व रागाने म्हणाली, 'आक्का, पहा बाई, हे कारटं मला कांही काम सुधारूं देत नाही. तूं तरी पहा रडायचा थांबतो काय ते!'

खरे पाहिल्यास, आक्काताइला लहान मुलांचा विलक्षण छंद होता. कुणाचीहि किरकिरीं मुलें ती ओंजारून गोंजारून,

त्यांचा पापा घेऊन, त्यांना हंसविल्याशिवाय रहात नसे. म्हणूनच माझा भाऊ जास्त किरकिर करूं लागतांच त्याला आईने घेण्यास सांगितले. आकाताई त्याला खांद्यावर घेऊन बाहेर आली. ती नानाप्रकारें त्या मुलास शांत करण्याचे प्रयत्न करीत होती

माझ्या त्या भाऊरायाचे रडे पाहून, माझी स्थिति अगदी केविलवाणी झाली. मी वेड्या मनःस्थितीतच आकाताईचा पदर माझ्या हातात धरून, तिच्या पाठीमागे धावत होतो. मधून मधून चुचकारण्याचाहि प्रयत्न करत होतो. पण सारे व्यर्थ!

माझ्या बाहूंची आकाताईच्या पदराच्या टोकाला, मगर-मिठीच बसलेली होती. ती सुटायची काय बिशाद! मी मारखा तिच्या पाठीमागून धांवत होतो. तिला माझी मोठी गंमत वाटत होती. आपल्या नेहमीच्या थट्टेस तिने सुरवात केली; 'पंडित, हा बाळ कुणाचा?'

'माझा!'—मी म्हणालो.

'हट्! म्हणे माझा. दूध कोण रे पाजवत याला?'

'आई!'

'आंघोळ कोण घालतं याला?'

'आई!'

'आणि रडल्यानंतर गप्प कोण बसवत?'

'आई! आई!! आई!!!' मी रागानेंच बोललो.

' मग, हा बाळ तुझा रे कसा ? '

' हं, माझाच आहे तो.' मी बोललो.

माझा जागृत झालेला राग पाहतांच आक्काताईला हंसूं आले. पण हंसूं लपवून ती माझी गंमत करण्याच्या हेतूनें मला म्हणाली, ' म्हणे माझाच आहे तो. तो कसा तुझा ते सांग पाहू. का उगीचच म्हणायचं, माझा बाळ ? ' आक्काताई आतां माझ्याबरोबर लहान बनून, माझ्याशी वितंडवाद घालत होती. मी माझ्या बालपणाच्या स्वभावानुसार संतापून गेलो. मला आता मात्र तिच्या प्रश्नाचे उत्तर काय द्याव हे कळेना. म्हणून मी माझ्या पूर्वीच्याच म्हणण्याला पुष्टी दिली.

' हं, माझाच बाळ आहे ! '

' बरं ! घेशील तर ! ' असे म्हणून तिनं गर्रकन् गिरकी मारून त्याचा पापा घेतला. त्यालाही थोडे हिंदोळे दिलसे करून व आपण तिरपे डोळे करून माझ्याकडे पहात म्हणाली, ' आम्ही आता तुम्हाला देणार नाहीं बाळ ! आमच्या घरीच नेते त्याला ! '

' तुला कसे त्याला तुझ्या घरी नेता येईल ? ' मी आता मात्र संतापून गेलो. तिचा पदर हातांत घट्ट धरून ठेवला होता.

आपली चर्चा रंगली असें तिला वाटलें. ती कांहीं एक पर्वा न करतां आपल्या घरचा मार्ग आक्रमू लागली. मी

तिचा पदर हातांत धरून ठेवलाच होता. पण तिच्या चालीनें माझ्या हातांची पकड चटकन् निसटली. मी तेथें रिकाम्या हातानें थबकून उभा राहिलों. पण मी किती वस्ताद! तिच्याकडे चटकन् धांव घेतली. तिच्या पदराला ओढ देऊन तिला आमच्या घराकडे नेण्यास सुरवात केली. मोठ्यानें गळा काढून मी रडूं लागलों. मधून मधून तिच्या पदराला हिसडे देऊन, 'माझा बाळ दे दे!' असें म्हणून जोरानें ओरडूं लागलों. शेवटीं माझ्या रडण्यानं आंतून लगबगीनं धांवून आलेल्या आईनें, बाळाला आपल्या कडेवर घेतलें. माझें रडणेंहि थांबलें आणि मी आक्कातांईकडे पाहून तिला वेडावूं लागलों. आक्काताई चिडून धांवत येतांच, मी आईच्या पदरांत दडलों. मोठ्यानें ओरडलों,

"आई!"

◇ ◇ ◇



## — ७ —

दिवस जात होते, सकाळ होत होती. संध्याकाळ होत होती. सारं—सारं निसर्ग-नियमाप्रमाणें घडून येत होतें ! माझा भाऊहि निसर्ग नियमाप्रमाणें वाढत होता. त्याचे इवले इवले हात आतां मोठे मोठे दिसत होते. लडिवाळा करून हिंदोळे देणारे पाय दुडु-दुडू धांवत होते. केवळ दूध पिऊन खुणाखेरीज कांहींच न जाणणारे त्याचे ते चिमुकले ओठ; आतां बोबडे बोल बोलूं लागले होते. त्याच्या तोंडून बाहेर पडणारे ‘ दादा-आई-बाबा ’ हें सारें बोलणें कोण मौजेचें वाटायचें सर्वांना ! माझी आणि त्याची दोस्ती विलक्षण जमली होती. आम्हीं दोघे एका ताटांत दूधभात खात असूं ! मजा मजाच होती आमची !

राम-लक्ष्मण यांच्या मैत्रीची जी गणना करण्यांत येते; तीच अगदीं आम्हां दोघां भावांच्या बाबतींत दिसून यावयाची.

सर्व लोक आम्हां दोघांना पाहून कळे हरकून जायचे. त्यामुळेंच आमची आई घाबरी होऊन, तिन्हीसांजेला चारी तिकट्यांना लिंबू, चणे, मिरच्या उतरून टाकायची. चांगली ठसक्यात मीठमोहरीनं दृष्ट काढायची. आम्हां दोघांच्या कपाळांवरून दोन्ही हात ओवाळून त्यांचा एकमेकांवर घासून काढलेला काड्-काड् असा आवाज ऐकताच, आम्ही दोघे एकमेकांकडे पहायचे. डोळे मिचकून गालांतल्या गालांत हंसूं लागायचे.

सूर्य हंसत होता. फुलं हंसत होतीं. फुलपांखरं इतस्ततः बागडत होतीं. आम्हीहि आमचें जीवन त्यांच्याप्रमाणें हंसत खेळत कंठत होतों. अशा या आमच्या आनंदी जीवनांतील एक दिवस....

गणेशचतुर्थी चार सहा दिवसांवर येऊन ठेपली होती. घरोघरीं रंगवणी, मखरं व गणपतीविषयक चर्चा मोठ्या प्रमाणांत चाललेली होती. त्याचप्रमाणें आमच्याहि घरांत तो विषय मोठ्या प्रमाणांत चर्चिला जात होता. यंदाच्या गणपतीच्या बाबतींत वडिलांनी भलताच पुढाकार घेतला होता. आमचें घर मुळांतच रंगवावयास योग्य नव्हतें. तरी देखील त्यांनी आईस उभें घर सारवून घ्यावयास लावून वर चौकपीठाचा सुंदरसा रंग चढविलेला होता. येडौल दिसणाऱ्या गणपतीच्या दिवळीसभोंवार मखर करण्याचा खटाटोप चालू होता त्यांचा. वडील तिकडें मखराचे कागद व्यवस्थितपणे कापून घेण्याच्या

नादांत होते. आणि इकडे त्यांच्याच शेजारी आमचे बाबा-मंडळ गणपति कसला आणायचा, या विषयावर विचार करीत होतें. माझ्या भावाच्या व माझ्या आवडीत बरीच मोठी भिन्नता होती. वाघ-सिंहाशी लढत देणारा, धाडसी गणपति त्याला हवा होता. आणि माझा तर त्या गोष्टीला संपूर्ण विरोध, मला वडिलांनी आपल्या बरोबर नेऊन 'शकुंतला' हा चित्रपट दाखवला होता. मला त्या चित्रपटामधील शकुंतला दुष्यंताला पाणी, घालत असलेला, अगर कृष्ण कालिया मर्दन करीत असलेला अशा प्रकारचा गणपती हवा होता.

आमची चर्चा आतां विलक्षण विकोपाला गेली होती! वडील अखेर रागानें म्हणाले, 'उगाच, खिरीच्या अगोदर भचभच रे कशाला हवी? जा पाहूं बाहेर खेळण्यास. ज्या वेळीं गणपति आणायचा तेव्हां तुम्हा दोघांना बरोबर नेईन. मग तर झाले ना?' 'हं' असें म्हणून आम्ही दोघे चटकन् बाहेर खेळायला आलों. पण बाहेर आता कोणीच जिगर-दोस्त खेळतांना दिसेनात. मी भावाचा हात हातांत धरून पुढें पुढे होत, महाकालीच्या देवळाजवळ आलों. पण तेथेंहि तोंच प्रकार. चोहोंकडे कसा सुनसुनाट! मी इकडे तिकडे पहात असताना मला कोणीतरी बोलावते आहे असें वाटलें ही तर हांक मलाच असावी. मी बाजूला वळून पहातोय, तो काय? साधारण विशी ओलांडलेला एक गृहस्था, आम्हांकडे पाहून मोठ्या धूर्तपणानें हंसून म्हणाला, 'बाळांनो, तुम्हांला पतंग उडवता येतो काय?'

त्या वेळीं शिवाजी पेठेंत पतंगाचं विलक्षण प्रस्थ माजलेलं होतं. लहानापासून थोरापर्यंत सारीजणं पतंगाच्या भोंवती बसून, वेडी बनून राहिली होती. आणि अर्थातच मोठ्याचं वेड लहानांत प्रविष्ट व्हावं यांत अयोग्य असें काय? आम्ही सारेजण पतंगाच्या भोंवतीं बसून राहिलों होतों. त्याचप्रमाणें एक दोन वावड्या आणून त्यांची वाटहि लावलेली होती. पण अलीकडच्या चार-सहा दिवसांत मला एकहि वावडी उडवावयास मिळालेली नव्हती. आणि तो मनुष्य माझ्यापुढे अकस्मात् येऊन मला म्हणतो, 'बाळानो, तुम्हाला पतंग उडवता येतो का?' मनांत वरील विचार येऊन गेले आणि माझी कळी खुलली! मी टणकन् उडी मारली व माझ्या पायामध्ये असलेल्या वाळ्या-तोड्यांनी खळखळ असा आवाज केला. त्या आनंदामुळेच मी माझ्या भावाला छातीशी कुरवाळण्याचा प्रयत्न केला; आणि तो ओरडूं लागला. काय झालें असें मी विचारलें? त्याच्या कानात असलेल्या मुद्यांकडे माझा हात वळला व त्याने आपला कान दुखत असल्याबद्दल मला सांगितले. मी त्यानंतर त्याच्या कानांत 'जादू मंतर फू ऽ-ऽ' असें केलें व चटकन् त्याचा कान बरा केला. आमच्यासमोरे उभा असलेल्या मनुष्याकडे पाहून मी त्याला म्हणालो, 'अहो, आम्हाला पतंगाचा फारच षोक आहे.'

'होय ना! मग तुम्ही आज पतंग कां नाही उडवत?' तो मनुष्य मोठ्या जिव्हाळ्याने आमची चौकशी करूं लागला.

'आम्हांला आमचे आईवडील पतंगासाठी पैसे देत नाहींत! म्हणून आम्हांला पतंग विकत आणतां आला नाही. मग सांगा बरे, आम्ही तो कोठून उडवणार?' मी माझ्या उजव्या हाताची बोटे नाचवीत त्यांना म्हणालो.

'बाळ तुझे म्हणणे खरें आहें! पण मी...तुला पैसा दिला तर...? घेशील का तूं?' तो थोडा अडखळत बोलला.

पण त्याचे तें बोलणें ऐकून मी फार आनंदीत झालो. माझा तो आनंद माझ्या चेहऱ्यावरून, दुथडी भरून वाहणाऱ्या नदी-प्रमाणें वहात होता. मी त्याला म्हणालों, 'हो, द्या ना. आम्ही चालणार नाही असे कुठे म्हटले?'

'नाही तसं कांहीं नाही पण...बरं चला तर, त्या महादेवाच्या देवळांत मी तुम्हांला पतंग देतों.' आमच्या हाताला धरून तो आम्हांला तेथे घेऊन गेला. आजूबाजूला कुणा मानवाची चाहूल लागत नव्हती. सर्वत्र कसे अगदी सामसूम झाले होतें! आम्हीं देवळांत प्रवेश करतांच तो आम्हांकडे वळून म्हणाला, 'तुम्हां-पैकीं कुणाला रे पतंग हवा?'

'मला-मला' मी व माझ्या भावानें आनंदानें उद्गार काढले.

'दोघांना पण हवेत?'

'होय–' पूर्ववत् आम्ही दोघे बोललो.

'तुम्हांला पतंग हवा आहे ना? तर मग एक अट आहे बुवा!'

'कसली?' मी म्हणालों.

'मी पतंग देईन, पण तुझ्या पायांतील वाळे तोडे व तुझ्या भावाच्या कानांतील मुद्या मला द्यायला पाहिजेत.' तो रागानें म्हणाला.

'प...प...पण....!'

इतक्यांत तो क्रोधानें म्हणाला, 'चूप! आतां तुमचे कांही चालायचे नाहीं, मुकाट्यानें स्वस्थ बसा आणि मी काय करतो तें पहा व नंतर दोन पतंग घेऊन मजा करा!' इतके बोलून चटकन् त्याने आपल्या खिशांतील हत्यार बाहेर काढलें. माझ्या पायांतील वाळे, तोडे व भावाच्या कानांतील मुद्या काढून घेतल्या. आणि आम्हांला पतंग वगैरे कांहीच न देता तो पळू लागला. मला त्याचा फार राग आला. मी त्याचा रस्ता रोखूं लागलो व बोललो, 'आम्हांला पतंग दे—आम्हांला पतंग—दे!' पण तो कुठला आलाय् ऐकायला. त्यानें चटकन् माझ्या तोंडांत मारली व पोबारा केला.

त्यानें मारलेल्या चपराकीनें मी विव्हळ होऊन रडूं लागलों. मी रडत असलेला पाहून माझा भाऊहि रडूं लागला. आमचे आर्त स्वर ऐकून, शेजारपाजारचीं माणसें आमच्याभोंवतीं जमा झाली.


थोड्याच वेळांत हा सारा प्रकार कळून आला. चोराविषयीं नानाप्रकारचे तर्क वितर्क प्रत्येकजण लढवूं लागला. पोलीस

कचेरींत नोंद करण्यासाठीं धांवपळ सुरू होती. इतक्यांत माझी आई आली.

तिनें आम्हां दोघांना आपल्या धडधडणाऱ्या उराशीं घट्ट धरले. आपल्या अश्रूंनीं आम्हांला अभ्यंगस्नान घातलें. 'माझीं बाळं मला जिवानिशीं परत मिळालीं. यांतच मला माझं सर्वस्व मिळालं !' असें म्हणून, त्या भोळ्या भाबड्या मातेनें आमच्या गालाचे पटापट मुके घेतले.

♠ ♠ ♠

## — ८ —



कालाचीं पाउलें पुढें पुढें पडत होतीं. त्याच्या पाठोपाठ जगहि भ्रमण करत चाललें होतें ! हिंवाळा जात होता. उन्हाळा येत होता. उन्हाळा जात होता. पावसाळा येत होता. सारेंसारें बदलत होतें !

आम्हीहि निसर्गनियमाप्रमाणें बालवय अतिक्रांत करूं लागलों होतों. आमच्या घरांत आता, एका तिसऱ्या भावानें पदार्पण केलें होतें. तोहि आम्हां दोघांच्या सारखाच होता. आमचें एकमेकांचें प्रेम त्याच्यावरहि होतें. आम्हां दोघांच्या इतका, तोहि सर्वांना वेड लावणारा असा मनमोहक पुतळा होता. कोणत्याहि मातेची थोरल्या मुलांपेक्षा लहान मुलांवरच जास्त ममता असते. या नव्या भाऊराजाचें देखील आई

फार कौतुक करत असायची. माझ्या पाठीवरच्या भावाला तें छोटें मूल पहाण्याचा, आयुष्यांतील पहिलाच प्रसंग. त्यामुळें त्याला त्याच्याबद्दल किती नाविन्य व कौतूक वाटून रहायचें. मी ज्याप्रमाणें लहान असतांना माझ्या पाठीवरच्या भावाला घेण्यासाठीं धावायचा तद्वतच आतां तो धाकट्या भावाच्या बाबतींतहि करूं लागला होता. पूर्वी मला शेजारची मंडळी चिडवत होती. त्याचप्रमाणें त्यालाहि ती चिडवत होती. मला ती मंडळी जरी चिडवत असली तरी पण माझ्या अंगी सहनशीलता हा मोठा गुण होता! त्यामुळे मी ते सहन करूं शकलो. पण त्या गोष्टी माझ्या मधल्या भावाच्या बाबतीत फारच बिरळ्या! तो जरा असे कांहीं झाले कीं इतका तापायचा की बस्स! सगळ शिव्या द्यायला सुरुवात करायचा. त्या बिचाऱ्यांनी ऐकतच रहावं!

मी आतां आपणांस एकवणार असलेली आठवण अशाच एका वेळेची आहे. त्या समयीं भावाने दुसऱ्याची कळ काढून त्याला स्वतः दिलेल्या शिव्या व त्याच्या कागाळ्या ऐकून वडिलांनी त्रासाने दिलेला मार... त्या वेळी आईच्या अंतःकरणाला झालेल्या यातना...!

वसंतऋतूचा महिना आला म्हणजे झाडांना नवी पालवी फुटते! फळा-फुलांना बहर येतो! कोकिळ पक्षी सुंदर आम्रवृक्षाच्या मोहोराचा समूह पाहून, जणूं काय तो पृथ्वीचा भाट बनून नवऋतूचा संदेश तुमच्या आमच्या कानी पोहोंचवीत

असतो. याप्रमाणें प्रत्येक ऋतुमानांत वेगवेगळे बदल घडून येत असतात. त्यांची ती पुनरावृत्ति मुलांच्या बाबतींत घडत असते. सृष्टिमातेचे खेळ ऋतुमानाप्रमाणें बदलत असतात. पावसाळा आला म्हणजे लंगडा. हिंवाळ्यांत पतंग उडविणें. लगोऱ्या, आट्यापाट्या, फुटबॉल, क्रिकेट व उन्हाळ्यांत खोखो, हुतुतू यांसारखे विविध खेळ, कालमानाप्रमाणे खेळले जातात.

आतांचे दिवस उन्हाळ्याचे होते. रंकभैरवाच्या देवळांत बिस्तृत पटांगण होते. मग काय? आमच्या खेळण्याला विलक्षण रंग तेथे चढत असे. खोखो, हुतुतू, आट्यापाट्या यांसारख्या खेळांची रंगत तर औरच !

घरची चार चिल्लीपिल्ली असली व घरही रस्त्याच्या कडेला असले की, घरच्या मंडळींचा जीव कधी स्थिर नसतो. त्यांना नेहमी घोर लागून राहिलेला असायचा की, आपले मूल बाहेर जाईल का? एखादी गाडी, सायकल वगैरे आली तर... ? या विचाराने त्यांचे काळीज चर्र होत असते. त्यांचे चित्त अर्धे बाहेर व अर्धे कामांत गुंतलेले असते. आमच्या घराच्या बाबतींत तो धोका मात्र अगदी नव्हता. किल्ल्याप्रमाणे तटबंदी असलेल्या देवळाच्या आवारांत मोटारींची अगर गाडीची आंत येण्याची काय बिशाद होती? कोणत्याहि मनुष्यानें आपले पोर कितीहि खट्याळ असले तरी ते देवळांत सोडले म्हणजे निर्धास्त रहावें !— आमचे जवळ जवळ सर्व बालपण त्या तटबंदीतच गेले आहे !

आमच्या गल्लीतील इतर सवंगडी शाळा सुटतांच परत आले होते. घरीं आईनें दिलेला घांस-मुटका खाऊन ते हळुं-हळूं देवळांत जमूं लागले होते. सगळ्यांच्या कडून हरएक प्रकारची चर्चा, नाना कार्यक्रम आंखले जात होते! मधून मधून विनोद-लहरींचा उठाव होत होता! मध्येच एखादी व्यंग असलेली व्यक्ति चालली कीं, तिची नक्कल करण्यांत येई! गल्लींत दोन खाष्ट स्त्रिया होत्या. मुलें चेंडूनें खेळत असतांना तो त्यांच्या अंगाला लागला अगर घरांत गेला तर तो त्या मुळींच परत द्यावयाच्या नाहींत, उलट शिव्या मात्र भरपूर दिल्या जायच्या! अशा स्त्रियांच्या टवाळीच्या गप्पा चाललेल्या होत्या ! सारेजण रंगात आले होते. तोंच एकानें कल्पना सुचविली !—



'चला रे, आपण आट्यापाट्या खेळूंया !'


यांवर कांहींनी होकार दिला तर कांहींनी नकार दिला. नकार घंटेचाच नाद मोठ्याने पडल्यामुळे तो डाव अर्थातच नापास झाला! दुसऱ्याने 'हुतुतू' चा डाव सुचवला त्यासही याच नादलहरी उमटल्या! आट्यापाट्या, चेंडू वगैरे अनेक खेळ सुचविण्यात आले, पण ते सारे मागे पडून अखेर 'लंगडीचा' खेळ सर्वानुमते पास करण्यांत आला! गडी वाटून घेण्यात आले! दोन विभाग करण्यात आले! ओलीसुकी करण्यात आली. यामध्ये आमच्याकडच्या भिडूंचाच विजय झाला! आम्ही पळू लागलो, त्यांच्यातले गडी लंगडी घालून आमची पाठ शिवू लागले. सुरवातीच्या जोडीत मी गेलो!

खेळाला विलक्षण रंग चढला होता. आमच्याकडील सर्व गडी बाद करून आतां त्यांनी पळावयास सुरवात केली. आम्ही लंगडी घालत होतों. ते पळत होते. त्यांच्यातील गडी बाद होत होते. आमच्याकडील गडी देखील दमल्यामुळे लंगडीचा पाय टेकीत होते.

आतां परत खेळाला सुरवात झाली होती. आम्ही पळत होतो. सुरवातीला माझ्या मधल्या भावाला पाठविण्यात आले होते. माझा भाऊ वयाने जरी लहान असला तरी देखील तो खेळण्यांत फार पटाईत होता. आत्तांच त्याच्या जोडीदाराने हार खाल्ली; पण हा कांहीं कुणाला सांपडायला तयार नाहीं. लंगडी घालणारा तो विरुद्ध बाजूचा भिडू त्याला पकडण्याच्या हेतूने कोण प्रयत्न करतो आहे! पण हा त्याला दाद देखील

लागू देत नाहीं. हा चटकन् सटकायचा की आतां येथें तर नंतर तेथें जावयाचा. सारेजण त्याच्या खेळाचे मोठे कौतुक करत होते. मीहि त्याचा तो तुफानी खेळ अभिमानाने पहाण्यात रंगून गेलो होतो. मला त्याच्या क्रीडानैपुण्याबद्दल कोण अभिमान वाटून रहावयाचा म्हणून सांगू ?

पहिला गडी बाद झाला. दुसरा नव्या दमाचा गडी तीरासारखा धांवून आला. त्याला माझ्या भावाचा तो चाललेला मघाचा चिकाटीचा खेळ पाहवला नाहीं. त्याने मनाशी असे ठरविले की, जायचे तर अगोदर यालाच बाद करावयाचे. तो अगदी थांबून आला व त्याने सारे रिंगण फिरावयास सुरवात केली. फिरतां फिरतां तो भावाच्या जरा जवळ गेल्यासारखा झाला; व क्षणार्धातच...तो एकदम पाय टेकून टाळ्या वाजवू लागला. 'मारला–मारला.' माझ्या भावाला भलताच राग आला व तो रागाने पुढे धावला व एक शिवी हांसडून ओरडला. 'मी हरलो आहे का ? बेट्या, खरे सांगतोस की नाहीं ?' इतके बोलतो न बोलतो तोंच त्याने त्याच्या श्रीमुखात दिली. तोपर्यंत आम्ही सारे हे दृश्य पहातच होतो. शेवटी सारेजण पुढे धांवलो व त्यांचे भांडण आम्ही सर्वांनी मिटवले. पण ती भांडणाची तक्रार ज्या मुलाला माझ्या भावाने मारले होते त्याने आपल्या वडिलांच्या जवळ मांडली आणि येथेच सारा अनर्थ घडला ! आम्ही जावयाचे कसे ? हा मोठा विचार माझ्या मनात घुटमुळत होता. आम्ही घरी गेलो की आम्हांला



याचे पूर्ण बक्षीस मिळणार याची जाणीव आम्हांला होती. काय करावे हेच आम्हांला कळेना.

तिन्हीसांजेला आम्हांला आमच्या घरीं मुकाट्यानें जाणें भागच होतें. आतांपर्यंत घरी कोणीच आले नव्हते. पण बाहेरच्या आमच्या सवंगड्यांनी सांगितलें होते कीं, आमच्या माराची वार्ता वडिलांच्या कानांवर गेलेली होती. त्यांनीं असे सांगितलें होते कीं, 'येऊं देत घरीं, मग त्यांचे पाहतो काय पाहावयाचें तें.' त्याचा अर्थ काय आहे हे आजपर्यंत वडिलांच्या सहवासांत राहून मला आज पूर्णपणें कळलें. पुढील प्रसंग ओळखूनच माझें मन घरीं पाय टाकण्यास कचरत होते. पण आतां मात्र आम्हांला निमुटपणें घरीं जाणें भागच होतें. आम्ही खाली माना घालून चालूं लागलों.

घरांत वडील बाहेरील सोप्यांत बसले होते. आम्ही दोघे घरीं गेलों. त्याशिवाय दुसरा इलाजच नव्हता. काय म्हणतात ना–' आलिया भोगासी......' बराच वेळ गेल्यानंतर त्यांचें बाहेर लक्ष गेलें. ते म्हणाले, ' अरे कोण आहे ते ! '

' मी ' असें मी उद्गारलों.



'कोण? पंड्या?' मोठ्या आवाजांत वडील म्हणाले.

'होय' असा मी हुंकार दिला.

'मग असे बाहेर कां उभा? चला आंत या पाहूं.' आम्ही अंग लपवून त्यांच्या समोर गेलों.

'आंत कोपऱ्यांत कांही आहे काय गं?' त्यांनीं आईला रागानें विचारलें.

आईनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. मात्र तिचें ओक्साबोक्सी स्फुंदणें आम्हांला ऐकूं येत होतें.

'तुझ्या या लाडानेंच पोरांचे वाटोळें व्हावयाची वेळ आली! चालते व्हा तुम्ही सगळीं.'

ते काय तोंडाला येईल ते बोलत होते. अखेर स्वारी आंत आली व येतांना त्यांनी आपल्याबरोबर 'जोडा' आणला. ते जोडा आम्हांवर उगारत म्हणाले, 'बाज्या, तूं आज दोनप्रहरी कुणाला मारलेस?' भावानें कांहींच उत्तर दिलें नाहीं.

वडिलांच्या तळपायाची आग मस्तकाला चढत होती व ते रागानें आम्हांवर 'जोड्यांचा' मारा करून शिव्यांचा ऊत आणून वाटेल ते बरळत होते. इतक्यांत आई बाहेरून धांवत आली व ओरडली, 'सोडा हो त्यांना, पुरें झालें तें मारणें; कोवळ्या हाडांची व मृदु मनाची बाळं तीं!' पण...तीहि आमच्यांतील एक बळी ठरली. आम्ही तिच्या पंखाखालीं झाकले गेलो, पण आमच्या बरोबर तिलाहि थोडा प्रसाद मिळालाच. तिचें अंतःकरण विव्हलतेनें खिन्न झालें...

—१—



बी पेरलें जात होतें. मोड फुटत होते, रोपें वाढत होतीं आणि निसर्गनियमाप्रमाणें झाड वाढत होते. हा झाडाझुडपांचा नियम प्राणीमात्रास व निसर्गास त्याचप्रमाणें मानवासही लागूं आहे. या घटना ऋतुमानाप्रमाणें व्यवस्थितपणें पार पडत असतात.

मी आता बाराव्या वर्षांत पदार्पण केलें होतें. माझा मधला भाऊ आठ वर्षांचा व धाकटा सहा वर्षांचा होता. कालाच्या ओघाबरोबर आमच्यांतहि बदल घडत चाललेला होता. पूर्वी सतरा वेळ कमरेंतून खाली सरकणारी पँट, डाव्या हातानें शेंबूड पुसून व त्यांतलाच प्रसाद खालच्या जिभेला देऊन, खालच्या पँटला तावातावानें वर हिसडणारा पंडित आज नव्या

जगांत वावरत होता. आज तो मद्रास कापडाची पँट घालून मर्सराईज्ड शर्टांत वावरत होता. पूर्वीची त्याच्या माथ्या-वरची शेंडी आता दूर पसार झालेली होती, तेथें आता गोंडस व झिरमिरीत काळ्या केसांनी वास्तव्य केले होतें. काळ पालटत होता, जगहि पुढें जात होतें, आणि सारें सारें सृष्टी-देवीचें वातावरणहि बदलत होतें.

निसर्गनियमाप्रमाणें इतके सारे जरी बदलत होतें तरी देखील, पंडित एक गोष्ट मात्र विसरला नव्हता. त्याला त्याची आई सर्वांहून श्रेष्ठ वाटत होती, तिच्यापुढें तो साऱ्या जगाला तुच्छ लेखत असे.

आईचें अंग सुरवातीपासूनच स्थूल असल्यामुळें तिला दुसऱ्या बाळंतपणांत थोडासा त्रास झाला आणि त्यामुळें तिच्या अंगांत थंडी मुरली होती, कळा वाढत होत्या, वेदनाही तिला असह्य होऊं लागल्या होत्या. आजपर्यंत तिनें आपल्या शक्तीच्या जोरावर त्या दुखण्याला विशेष दाद दिली नाहीं. पण आतांचे दिवस प्रौढ वयांतील असलेनें (आत्तांचें तिचें वय अंदाजे ४० वर्षांचे होते.) तिला थोडा फार त्रास जाणवूं लागला. त्या बाबतीत ती बोलत नसली तरी वडिलांच्या कृपाप्रसादाची भरही मोठ्या प्रमाणांत असलेने तिला लवकरच हाय खावी लागली. माझ्या आईच्या त्या दुखण्यामुळे आता घरांतील किरकोळ कामेसुद्धा ती करूं शकत नव्हती. मी देखील तीं कामें मनःपूर्वक करावयाचा व त्यांतूनहि शाळेला

जावयाचा. आमची शाळा आमच्या घराच्या जवळच असलेनें मी शाळेला लवकरच जात नसायचा. अकराची घंटा घरींच ऐकूं येत असे. नंतर मी जें कांहीं जेवण तयार असेल तें भराभरा जेवून शाळेला पळत असे.

एकादे दिवशीं जेवण तयार नसेल तर आई म्हणायची 'पंडित, आज उपाशीच जाणार का तूं?'

'नाहींतर काय करू?'

'थांब जरासा! भाताला कढ आलेला आहे पाहा.'

'हं पण नकोच मुळीं, वेळ लागेल! जातोच मी!'

'दोनप्रहरीं (दुपारीं) मधल्या सुट्टींत मी येईन लवकर!' असें बोलून मी पिशवी पाठीला लावून तिच्या प्रत्युत्तराची अपेक्षाहि न करता पसार होत असे!

दोनप्रहरीं मी जेव्हां घरीं जावयाचा तेव्हां ती माझ्या चाहुलीकडे आतुरतेनें लक्ष लावून बसलेली असायची व माझ्या पोटांत पहिला घांस पडला कीं तिला मोठें समाधान वाटत असे.

मला घरांतील कामें नेहमींच करावीं लागत असत. त्याचप्रमाणें घरचें सारवण हेंहि महिन्या दोन महिन्यांतून घर जास्तच घाण दिसूं लागलें म्हणजे करावें लागे. पण हें काम एका दमरकामाप्रमाणें झटकापटकीं व फुकट–फाकट कुठचें व्हायचें? तर त्याच्यासाठीं आम्हांस बक्षीस द्यावयाचें हें

अगोदरच ठरलेलें असायचें आणि त्या वेळेच्या आमच्या मानानें फारच मोठें बक्षीस म्हणजे दोन आणे किंवा तीन आणे असायचे. पण त्यावर आमची स्वारी विलक्षण खूष असायची. आतां मी आपणांस सांगणार असलेलीं स्मृति अशा सारवणावेळचीच आहे. यंदाचें त्र्यंबुलीचें वर्ष आमच्याकडे आलें होतें. वडील नेहमींच देवीच्या देवळाकडे जावयाचे. त्यांच्याबरोबर माझे दोन्ही भाऊ जात असत. मी मात्र शाळेंत जात असल्याकारणानें घरींच राहायचा. सुट्टी असल्यास मात्र मी देवळाकडे जायचा.

त्या दिवशीं कुठल्याश्या सणाची आमच्या शाळेस सुट्टी होती. सकाळीं वडिलांनीं मला विचारलें, 'पंडित, माझ्याबरोबर येतोस कां ?' पण मी त्यांना सविनयपणें नकार दिला. तसें पाहता आज मला जावयास कांहींच हरकत नव्हती. पण कां कुणास ठाऊक मला घर सोडून विशेषतः दूर जावयाचा कंटाळा यावयाचा ! जरी गेलो तरी घरची ओढ लागून रहायची सारखी ! 'आईनें जेवण कसें बरें केलें असेल ? तिला शिक्यावरची चटणी, मीठ कोणी काढून दिलें असेल ?' असे एक ना दोन अनेक प्रश्न मनांत भेडसावयाचे. घरीं केव्हां एकदां जातो असें मला व्हावयाचें. माझ्या आईला मी डोळे भरून केव्हां एकदां पाहतो असें व्हावयाचें. त्यामुळेंच मी वडीलांच्याबरोबर जाण्यास नकार दिला. सकाळीं दहा वाजेपर्यंत शेजारच्या सवंगड्यांशीं खेळून दमून भागून मी

घरीं परतलों. आईचा स्वयंपाक तयारच होता. तिनें विचारलें, 'पंडित, जेवायला उठतोस काय?' माझें थट्टेखोर मन बोललें.

'नाहीं.'

'तयार आहे स्वयंपाक म्हणून तुला म्हणते—रे!' आई केविलवाण्या स्वरांत म्हणाली.

'बरं, मग चल तर जेवायला बसूंयाच!'

आम्ही दोघांनीं अन्न ताटांत वाढून घेतलें. जेवणहि अगदीं साधेंच पण रुचकर होतें: मी व ती जेवत होतों. इतक्यांत तिचें लक्ष भिंतीकडे गेलें. आई जेवतां जेवतां म्हणाली, 'पंडित, आज एक कामगिरी करणार काय?' आईच्या प्रेमळ प्रश्नामध्यें किती कोमलता व सहृदयता होती! मी आश्चर्यानें बोललों, 'कसली कामगिरी आहे?' मुलांच्याकडून काम करून घ्यायचें झालें तर कोणता शब्द टाकावा हें तिनें पक्के ओळखलें होतें. यांतच तिची कुशलता दिसत होती. तिच्या त्या शब्दानें माझ्या भावनेस अलगद स्पर्श केला.

'पण काय काम आहे ते कळूं दे तर अगोदर!'

'काम रे कसलें? अगदींच क्षुल्लक! अरे ह्या भिंती सारवायला हव्यात!' ती सहजपणें बोलली.

मीं तोंड फिरवलें व म्हणालो, 'मग कर ना गं तूंच.'

‘ मी जर करणार असते तर तुला रे कशाला सांगितलें असतें? मुकाट्यानें माझें मीच सारें केलें असतें. पण....?

‘ नाहीं! नाहीं!! नाहीं!!!’

‘ बरें बाबा, राहूं दे आतां, झालं!’ असें म्हणून ती शांतपणें जेवूं लागली. पण माझ्या डोळ्यापुढें चकचकीत खणखणणारी चवली मला कुठली स्वस्थ बसूं द्यायला? मीच मुळीं तिला म्हणालों, ‘ चार आणे देणार का मला?’

‘ चार आणे! नाहीं रे बाबा, दोनच आणे देईन, पहा हवें तर.’

‘ बरं तर’ असें म्हणून मी तें मान्य केलें. दुसऱ्या मजल्यावरून माती आणून मी ती पाण्यांत कालवली व पायाखाली पीप घेऊन सारवूं लागलो.

आई खालून मला पोतेरें देत होती भिजवून! मी व्यवस्थितपणें सारवण्यांत गुंतलो होतो. आई मध्येंच सांगावयाची, ‘ पहा हं तिथें चोरटें ठेवलें आहेस. तसें तूं ठेवूं नकोस हं?’ यानंतर मी हंसायचा व तिच्या कल्पनेची टर उडवायचा. पण ती आपलें म्हणणें वरचेवर खरें करीत असे.

आतां थोडे उंचावरचें अवघड असें सारवण मी करूं लागलों. हात वर पोहचेनासा झाला म्हणजे मला माझ्या टांचा वर कराव्या लागत असत. त्यामुळें स्वतःचा तोल

संभाळणें फार कठीण व्हावयाचें. पण मी त्याहिपेक्षां उंचावरचें घेण्याचा प्रयत्न करीत असतां माझ्या पायाखालचे पिप चटकन् निसटले व मी धाडकन् जमिनीवर कोलमडलों! माझ्या आईनें तें पाहातांच तत्क्षणीं हंबरडा फोडला, 'माझ्या पंडिता ऽऽऽरे !!'

आमच्या शेजारपाजारचे लोक जमा झाले. माझ्या डाव्या हातांत भांड्याचा कांठ घुसला होता. त्यामुळें मोठी जखम होऊन त्यांतून भळभळ रक्त वाहात होतें. त्यामुळें आईचें अंतःकरण विव्हळ झालें! 'आपण पोराला कशाला काम सांगितलें? आणि हें काय विपरीत झालें?' ती स्वतःला दोष लावून घेऊं लागली. माझी ती नाना प्रकारें समजूत घालण्याचा प्रयत्न करीत होती. तिनें हातांतील जखमेंत चुन्याचा व हळदीचा लेप भरला व चार आणे बक्षीस म्हणून दिले.

आजहि माझी नजर जेव्हां हाताकडे जाते तेव्हां तेथें मला त्या वेळची खूण दिसते व स्मृति प्रकर्षानें जाणवते! तो प्रसंग वर्तमानकाळ बनून माझ्यापुढें उभा राहतो!

◇ ◇ ◇

— १० —



माझ्या आईच्या अंगांत कळा येत असल्यामुळे तिला इकडून तिकडे जात असतांना सरकतच जावे लागायचे. मला माझ्या आईचे लहानपणीच मिळालेले काय ते सौख्य! आज मला ती 'नीज नीज लडीबाळा' असे म्हणू शकत नव्हती! माझ्या दोन भावंडांना काखेत घेऊन हिंडवू फिरवूं शकत नव्हती! ह्या सुखाला माझी ती दोन्ही भावंडे अगदीच पारखी झालेली होती! आणि मी......?

शेजारपाजारच्या मुलांना त्यांची आई आपल्या मांडीवर घेऊन त्यांच्याशी गीत गात असलेली, त्यांना दूध पाजवत

असलेली, आपल्या दोन्ही बाहूत घेऊन मटामटा चुंबन घेत असलेली माता पाहिली म्हणजे माझ्या त्या ओलावलेल्या हृदयाचे पाणी पाणी होई. मला वाटे माझ्यांतील सुखच मी गमावले आहे. माझ्या जीवनांतील निर्भेळ आनंद नाहींसा झाला आहे काय? असें मला वाटे.

'नको असा निराश होऊं, आहे तुझ्या जीवनांत सुख ! पाहिजे असणारे पुष्कळ आहे! तुझी आई इतर मुलांच्या आईप्रमाणे तुला हालवत डुलवत नसली तरीदेखील तुला गोड ममता तुझ्या आईपासून मिळत आहे. हे तुझे भाग्यच आहे. आज जगांत ज्यांना माता नाहींत असे कित्येक दुर्दैवी जीव आहेत, कित्येक बालकें जन्मताक्षणींच आपल्या मातृसुखास अंतरलेली असतात! त्यांनी आपल्या आईचे सुखहि पाहिलेले नसते. त्यांनी जगात कुणाकडे पाहून वावरायचे बरे?' माझे अंतर्मन मला वरील तत्त्वज्ञान सांगू लागले. मग माझ्या मनातील तळमळ थोडी कमी झाली. पण मनाची शंका मधून मधून जाणवल्या खेरीज राहात नसे.

खरे सांगायचे झालें म्हणजे मला जाणवणारा वरील विचार सोडून दिला तर माझ्या इतका जीवनात मीच सुखी होतो! माझ्या अंगाचा कोणी जर चिमटा काढला तर त्याची कळ माझ्या आईला येई; इतके तिचें वात्सल्य माझ्यावर होते. माझ्यासाठी तिचे अंतःकरण तीळ तीळ तुटायचे! घरात शिजणारा

अणू-रेणू तर मला मिळायचाच पण बाहेरच्या कुणीतरी तिन्हा-ईताने कांहीतरी खायचे दिले तर ते पदराखाली झाकून माझ्यासाठी व माझ्या भावंडासाठी घेऊन ती यावयाची! शेजारपाजारणी घरात येऊन गप्पा मारत बसल्या की आमची आई त्यांना आपल्या पंडिताच्या गोष्टी कौतुकाने सांगायची! कोणीतरी शेजारीण आमच्या आईला म्हणाली, 'पंडितच्या आई, तुम्हांला देवानें एखादी तरी मुलगी दिली असती तर तिचा घरकामांत चांगलाच उपयोग झाला असता!'

माझी आई तिला म्हणायची, 'कशाला हवी मला मुलगी! माझा पंडीत म्हणजे माझें सगळें आहे. कोणतें काम करायला त्यानें कसूर केली आहे?'

'होय बाई, खरें आहे तुमचें म्हणणें! पंडीत एखाद्या पोरीच्या वर काम करतो!' ती बाई उद्गारायची.

आईस माझ्याबद्दल फार अभिमान वाटायचा. तिच्या समोर मला कुणी नांवें ठेवलेली अगर बोललेले तिला मुळींच खपत नव्हते. ती अशी कांही तापायची की, बोलणाऱ्याची भंबेरीच उडवायची! तिनें पंडितचा इतका अभिमान बाळगावा इतक्या मोलाचा व गुणाचा पंडित होताहि तसाच. कधीं कुणाच्या एकांत नाही तर दोन्हीतहि नाही. आपलें काम भलें की आपण भलें, या मनोवृत्तीची त्याची वागणूक होती. त्यामुळें त्याच्या वावतींत कोणीच अक्षरहि काढत नव्हते.

माझ्या आईस माझ्याबद्दल ज्याप्रमाणें अभिमान वाटत होता त्याचप्रमाणें ती मला कुठलीं कामें काय प्रमाणांत सांगावीत, काय पद्धतीनें सांगावीत, यांतहि तरबेज होती. तिला स्वतःच्यापेक्षा माझ्या प्रकृतीबद्दल फार काळजी वाटायची. इतकेंच काय पण दुसऱ्याची नजर वाईट असते म्हणून मी जेवत असतां शक्य तो बाहेरचें माणूस आंत न येईल याची ती फार दक्षता घ्यावयाची. शिस्तीबद्दल मला नाना प्रकारच्या गोष्टी सांगावयाची. अशक्तपणावर नाना तऱ्हेच्या पौष्टीक खुराकांची यादी ती पाठ वाचून दाखवावयाची.

मला माझ्या या तरुणपणांत त्यांपैकी एकहि खुराक खावयास मिळण्याचा योग आला नाही. तसें पहायला गेल्यास—खारीक खोबरे, तूप वगैरे पौष्टीक खुराकांचीं नुसती नांवं ऐकूनहि मूठभर मांस चढायला मदत होईल ! मला कोणतेहि काम सांगतांना ती माझ्या कुवतीच्या बाहेर काम सांगायचीच नाहीं. पण ...माझ्यासारख्या तरुण सळसळणाऱ्या रक्ताला तें अनुभवाचे बोल कुठले आले पटायला ? मी केव्हा कांही काम करायचें झाल्यास तें हुमदांडगेपणानें करीत असे. अशाच तऱ्हेनें मी ओढवून घेतलेल्या परिणामाची स्मृति आपणांस पुढे सांगणार आहे—

आमचं घर टुमदार छोटसं ! अगदी आधुनिक नव्हे की अती जुनें नव्हे. मध्यम प्रतीचें, तीनमजली चांगल्या

गच्चीचें होतें. तिसऱ्या मजल्यावर बसलें कीं मनसोक्तपणें महालक्ष्मीच्या शिखराचें दर्शन घ्यावें. गार वाऱ्याच्या नाजूक झुळकेशीं मनसोक्त विहार करावा. अशा या रम्य घरांतील माझें जीवन किती आनंदी! घरांतील आईच्या हाताखालचीं सारीं कामें आटपून मी अगदी शांत चित्तानें तासन् तास तेथें वर येऊन मजेंत घालवायचा. मनाला किती आनंद वाटायचा म्हणून सांगूं?

संध्याकाळीं साडेचार-पांचच्या सुमारास मीं नुकताच शाळेंतून घरीं परत आलों होतों. घरांत आई नाहीं असें पाहातांच मी वरच्या गच्चीवर स्वस्थ बसून राहिलों. वसंताचा गार वारा वाहात होता. त्या वाऱ्याबरोबर माझे बंडखोर व मोहक केसही वाऱ्यानें भुर-भुर असे उडत होते. मी त्यांना सावरण्याचा पुष्कळ प्रयत्न केला पण, सारे व्यर्थच! ते पूर्वीप्रमाणें उडतात म्हणून मी त्यांचा नाद सोडला. आकाशांत स्वैरपणें इकडून तिकडे विहरणाऱ्या छोट्या छोट्या पक्ष्यांच्या समूहाकडे पाहात होतों. मी तसा सृष्टीमातेची शोभा पाहण्यांत किती वेळ रंगून गेलों होतों. माझें मलाच समजलें नाहीं किती वेळ झाला आहे तें? ज्या वेळीं खालून आईची हांक ऐकूं आली त्या वेळीं मी भानावर आलों.

'पंडित ऽऽ!' आईनें खालून जोरांत हांक मारली.

'काय ग आई?' मीहि तितक्या जोरानेच बोललो.

'जरा इकडे ये पाहूं!'

'आलो हं!' असें म्हणून मी चटकन् खालच्या पायरीवर पाय टाकला. उतरत असतांनाच मी आईला विचारलें,

'काय ग आई, काय काम आहे?'

'अरे खालीं तर ये ना अगोदर?' आई म्हणाली.

'हं आलों. काय काम आहे सांग बरं!' मी तिच्यासमोर उभा राहून म्हणालो.

'अरे पंडित, पाण्याच्या दोन कळशा आणतोस काय? पाणी कसलें ते घरांत नाहीं रे!'

'हो आणतो कीं!'

'पंडित, एकदम दोन कळशा नको हो आणूं!'

'म्हणजे?'

'अरे, एकदम जास्त ओझें उचलूं नये. नाहींतर पोटांत वाट सरकेल!'

'हं!' मी तुच्छतेनं म्हणालों व हसूं लागलों.

'नाहीं हं पंडित. खोटें नाहीं रे. आपण एकच कळशी आणावी बरं बाळ.'

'बर बुवा नाहीं!' माझ्या मनांत वेगळेच वादळ उठत होते.

घरीं नळ नसलेनें आम्हांस पाण्यासाठीं सरकारी नळावर जाणें भाग होतें. सकाळीं वडील सूर्योदयापूर्वी पानें आणण्यासाठीं बाहेर गेल्यामुळें, सकाळीं कोणीच पाणी भरलेलें नव्हतें.

त्यामुळें आतां पाण्याविना सर्व अडले होते. म्हणूनच आईनें आतां मला पाणी आणण्यासाठीं लावून दिलें होतें.

मी नळावर आलों त्या वेळेस दोनचार घागरींचे नंबर नळावर लागलेले होते. विसावें शतक हें. 'पाळीचे युग' अशी संज्ञा द्यायला कांहींच हरकत नाहीं! जेथें जावें तेथें पाळीच पाळी! त्याप्रमाणें घेणें भागच होतें. माझी पाळी येतांच घांसून स्वच्छ व निर्मळ केलेल्या कळशा नळाला लावल्या. माझ्या डोक्यांत मघाचे आईचे शब्द घोळत होते.

'जास्त ओझे उचलूं नये, पोटांत वाट सरकेल!'

'हं, भलतच कांहींतरी आईचं!' मी मनांत म्हणालों.

...... आणि माझ्या चेहऱ्यावर बेपर्वाईचे हास्य खेळूं लागलें. मी त्या तोऱ्यांतच एक कळशी खांद्यावर व दुसरी हातांत घेऊन चट् चट् असा पावलांचा आवाज काढीत घराकडे निघालो. त्या स्थितींत दारांत बसलेल्या माझ्या आईनें माझ्याकडे नजर टाकली; व ती म्हणाली, 'पंडित, मोठ्यांनी सांगितलेलं ऐकावं बरं! तूं जर ठेचकळून अगर तोल जाऊन रस्त्यांत पडला असतास तर .... अथवा तुझ्या पोटांतील वाट सरकती तर ... ऐरावताचा भार हत्तीनेच सहन करावा! दुसरा तो कसा बरें सहन करूं शकेल?'

—११—



थोरा मोठ्यांचीं मुलें! त्यांच्या पाठीशीं एकसारखे ओरडावे लागते. शाळेला जा, शाळेला जा! तेव्हां कुठें ती मोठ्या जुलमानें शाळेला जातात. जरी श्रीमंतांचीं मुलें शाळेला गेली तरी त्यांच्या अभ्यासाच्या बाबतींत नेहमींचाच पूज्यांक ठरलेला असतो! याला अपवाद म्हणून कांहीं श्रीमंतांचीं मुलें नेहमींच वाईट निपजतात, असें कांहीं नाहीं; हुशार देखील निपजतात. पण तीं फारच थोडीं! 'कालाची पावलें कालाप्रमाणेच नेहमी पडतात!' हे, गडकऱ्यांचे विधान माझ्या बाबतींतहि पूर्णपणें लागू पडतें. माझ्या मनांत शिकण्याची जबर इच्छा होती पण परिस्थितीचे तीव्र चटके बसूं लागल्यामुळें मला माझें शालेय जीवन सोडावे लागलें. पण....

घरांत आतां आईच्या अंगांतील कळा भलत्याच विकोपाला गेल्या होत्या. त्यांनीं तिला 'त्राहि भगवन्' करून सोडले होतें. पावसाळ्याच्या दिवसांत आकाश ढगाळलें कीं, नको तें जीवन असें होऊन जायचें बिचारीला. तिचे ते होणारे हाल मला पाहवत नव्हते. हृदयाला घरें पडत होतीं. मी तिच्यावर पुष्कळ औषधोपचार केला. पण गुण मात्र मुळींच आला नाहीं.

कांहीं कांहीं वेळेला तिला कळांचा त्रास अगदीं असह्य व्हायचा! मला काय करूं व काय नको हें कांहीं समजायचें नाहीं. मी घाबऱ्या स्वरानें तिला विचारायचा, 'आई—आई! काय ग करूं मी? तेल थोडं चोळूं का तुझ्या अंगाला?' तशा त्या अवस्थेंतहि माझ्या त्या चिमण्या जीवाचं हंसू यावयाचें तिला. दुखण्यांत असतांना देखील माझ्या तोंडावरून ती हात फिरवायची; म्हणायची, 'माझ्या बाळराजा रे तूं, तूं काय बरें करणार नाहींस माझ्यासाठीं? गप्प बसून रहा. नाहींतर जा, बाहेर खेळ जा पाहूं!' आणि असें बोलतां बोलतांच तिच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत असत.

तिच्या डोळयांत अश्रू पाहिलें कीं माझेंहि डोळे पाण्यांनीं भरून येत असत. मला हुंदका येई! मी हुंदका देतच म्हणे 'आईऽऽ!'

'बाळ. रडायला काय-रे झाले तुला? उगी रहा पाहूं! आपण रडायचं काय म्हणून? शहाणीं मुलें रडतात का कधीं? नाहीं; मग डोळें पूस पाहूं—'

त्या वेळीं उसनें हास्य का होईना माझ्या चेहऱ्यावर प्रकट व्हावयाचें! मग ती मला जवळ घेऊन प्रेमानें पापा घेत असे. मला तिच्या अंगांतील ताप जाणवूं लागला कीं मी चटकन् बाजूस जाऊन म्हणे, 'आई, तुझ्या अंगांत किती ग ताप आहे. मला तुझ्याजवळ बसवत नाहीं ग!' आई चटकन् आपलें तोंड बाजूस वळवे, त्याचें मला फार आश्चर्य वाटायचें. ती मला म्हणे, 'पंडित, शाळेला जाणार नाहींस का तूं? अकरा वाजून गेले पहा. मग, मी निमूटपणें उठून शाळेला जावयाचा.

मी स्वतःहून आईच्या प्रत्येक कामांत मदत करण्यासाठीं पुढें धावायचा. पण तिनें मला शाळेची वेळ झाली म्हणजे कधींहि काम सांगितलें नाहीं. आपल्या कामासाठीं तिनें मला शाळेंत गैरहजर राहूं दिलें नाहीं. उलट ती मला नियमितपणें शाळेंत जाण्यास प्रोत्साहन द्यावयाची. ती माझ्या शालेय जीवनांतील एक स्फूर्तिदेवताच होती!

सुरवातीसच मी आपणांस सांगितलें आहे कीं, माझ्या आईला कळांच्या वेदना फार व्हावयाच्या! त्या दिवसेंदिवस वाढतच होत्या. माझ्या भावंडांना आईची संवय लहानपणा-पासून विशेष नसल्यामुळें तीं तिच्या व्यथेकडे लक्ष पुरवायचीं नाहींत! पण माझें अंतःकरण तिच्या दर्शनासाठीं, तिच्या सेवेसाठीं कां ओढ घ्यायचें कुणास ठाऊक! मला तिच्या-शिवाय अगर तिला पाहिल्याशिवाय क्षणभर देखील स्वस्थता वाटत नव्हती. मी कुठें बाहेर असलों आणि मला माझ्या

आईची आठवण झाली कीं, मी कावरा बावरा होऊन जायचा. मी आईला सोडून कुणा पाहुण्यांच्याकडे राहण्यासाठी गेलों तर मला तेथें मुळीच करमायचें नाहीं !

गणेशचतुर्थीचे दिवस होते. त्यानिमित्त मी सरवडे या गांवी आमच्या चुलत्यांच्या घरीं गेलों होतों. तेथें त्यांनी माझी मोठी बडदास्त ठेवली होती. माझें तेथें कोण लाड पुरवले जात होते ! मला नाना तऱ्हेच्या गोष्टीचें महत्त्व सांगण्यांत येत होते. आपल्या गांवात अनंतचतुर्दशीच्या दिवशीं गणपतीचा मोठा उरूस होत असतो. त्याच्या पुढची ती भव्य भजनें-घरोघरी देवा पुढें करण्यांत येणारे करमणुकीचे कार्यक्रम. तीं जागरणं. सारें सारेंच कांही और होतें. तीं वर्णनं ऐकून सुरवातीस मी हरकून गेलों होतों. गणेशचतुर्थीच्या दिवसाची त्या रात्रीची गोष्ट.

मी एकटाच बाजूला बसलों होतों. आजूबाजूस कोणीच नव्हतें. मला माझ्या आईची आठवण झाली. माझी आई आतां काय करीत असेल बरें ? तिचें नडलें अडलें काम कोण करीत असेल ? हे विचार माझ्या मनांत घोळूं लागले ... आणि मीं शेवटीं मोठ्यानें रडूं लागलों. काय झालें म्हणून पाहुणे मंडळी माझ्याकडे धांवत आली. मी रडतच त्यांना म्हणालों, ' मला माझ्या घरी जायचे आहे. येथे मला करमत नाही. मला आत्तांचे आत्तां कोल्हापूरला पोहचवा.' त्यांना माझी समजुत करतां करतां पुरेवाट झाली. नंतर त्यांनी लागलीच दुसऱ्या दिवशीं पहिल्या गाडीनें मला कोल्हापूरला

पोंहचविण्याचे कबूल केलें. मगच मी रडायचा थांबलों. दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या गाडीने कोल्हापूरला परतलों.

आमच्याकडे शिवाजी पेठेंतील महाकालीचें देऊळ आलेनें वडील तिकडेच राहावयाला गेले होते. ते घरी येण्याचे मुळीं नांवच काढत नव्हते! घरचें जेवणखाण गेल्या वर्षांपासून त्यांनींच स्वतःच्या अंगावर घेतलें होते. ते तिकडून आम्ही जेवल्यानंतर आईला जेवण पाठवत होते, ते बारा-दोनला जेवण घेऊन आलो कीं मग माझी शाळा सुरूं व्हावयाची! तोपर्यंत....



अशा परिस्थितींतही, मी शाळेंतील परमपूज्य गुरुजी श्री. सी. स. सरपाटील यांच्या साह्यानें एक वर्षांत दोन इयत्ता पार पाडण्याचा प्रयत्न चालवला होता. माझे गुरुजी माझ्या कर्तृत्वाबद्दल भलतेच निःशंक होते. माझ्यावर त्यांचा अमर्याद

विश्वास होता. आमच्या शाळेंत त्यावेळीं 'बालहितवादी' नांवाचें मासिक त्यांनीं सुरू केलें होतें. त्याची पूर्ण जबाबदारी माझ्यावर होती.

आमच्या मासिकांत प्रसिद्ध होणाऱ्या माझ्या लिखाणा-बद्दल प्रत्येकजण शाळेंत माझी स्तुति करीत असे. पुढें त्या मासिकाच्या संपादकत्वाची जबाबदारी माझ्यावरच पडली. माझे गुरुजी, माझ्या गौरवांत अगदीं स्वेच्छेनें सहभागी व्हावयाचे. केवढा हा शिष्याबद्दलचा अभिमान ! त्यांच्या शाबासकीमुळें मी फार आनंदून जायचा. माझी छाती आनंदानें फुलून जायची. पण ......

मी व आई, वडिलांच्याकडे राहात नव्हतों. इकडे मला शाळाहि शेजारी होती. त्यामुळें मला येथेंच राहणें बरें वाटायचें. आई—ती तर जुन्या संस्कारानें पछाडलेली ! ती म्हणायची, 'जुनें तें सोनें'. उगीच दुसऱ्याच्या घरांत काय म्हणून राहायचें ? मी काय बिऱ्हाडकरू आहे होय ? तें कांहीं नाहीं. मी माझ्या सत्तेच्याच घरीं राहणार.' पण वडिलांना तिचें तें म्हणणें पटत नव्हतें त्यांनीं सारखी घाई चालवली होती. 'सर्वजण एकत्र राहूं या, उगीच तिकडे इकडे कशाला ?' वगैरे सारख्या गोष्टी ते वरचेवर बोलत. त्यांच्याकडे आम्हीं कधींच लक्ष दिलें नाहीं. आम्हांला त्यांनीं विचारलेंच तर आम्ही त्यांना टोलवत होतों.

परंतू पुढें पुढें त्यांनीं तो प्रश्न विलक्षण धसाला लावला. शेवटीं अगदीं अगदीं नाइलाजास्तव आईला तिकडे जाणें

भागच पडलें. सुरवातीला तिची फार स्तुती करण्यांत आली. वडिलांनी तिच्या त्यागाच्या, आपल्या प्रपंचांत आपल्या खांद्याला खांदा लावून केलेल्या कर्तृत्वाची वर्णनें शेजारच्या आयाबायांना ऐकवलेलीं पाहून आईलाहि थोडंफार बरं वाटायचं. दररोज घरांत नाना प्रकारचे पदार्थ बनवले जात होते. साराच आनंदी आनंद चालला होता......

पण तो आनंद अगदींच अल्पायुषी ठरला. थोड्याच दिवसांत आमच्या घरांतील अर्थखातें व्यवस्थित काम देईना! मूळ चलन जर बंद झालें तर? आजच्या या जगाच्या परिस्थितीवरून आपली काय स्थिति होते हें काय मी तुम्हांला सांगायला हवें? अगदीं तीच स्थिति आमच्या घरीं त्या वेळीं निर्माण झाली! घरांतील शांति अदृश्य झाली व मला माझ्या शाळेला 'खो' द्यावा लागला. त्या वेळेपासून पंडितच्या जीवनावर अणुबाँब पडला! पंडित गुरवाच्या आशा आकांक्षा फोल ठरल्या!

...त्याच वेळीं मी नोकरी धरली. पुढें कांहीं दिवसांनीं आईला तेथली हवा न मानवल्यामुळें घरची पायरी परत चढावी लागली. लुळ्या पांगळ्या आईला घेऊन मी घरांत परतलों. परंतू मला परत शाळेंत मात्र जातां आलें नाहीं. आई हेंच माझें परम दैवत! तिच्यासाठीं तनमनधन सर्वस्वी वाहूं लागलों. तिचें दुःख व तिच्या यातना कमी करण्याचा मी पुष्कळ यत्न केला. माझ्या आईशीं मी पूर्णपणें समरस झालों.

◇ ◇ ◇

—१२—



♥♥♥♥♥♥♥♥♥♥♥♥♥♥♥♥♥♥♥♥♥♥♥♥♥♥♥♥♥♥♥♥

मी आज काल आईची सेवा करण्यांत दंग झालों होतों. तिचें कोणतेंही काम करण्यांस कधींहि माघार घेतली नाहीं. माझी आई तेजःपूंज, मजबूत व सुदृढ शरीरबांध्याची स्त्री होती. पण... आजकालच्या सुरूं झालेल्या त्या घोर आजारानें तिला कसें दुबळें बनवून सोडलें होतें. तिच्या हाडांची काडी बनून राहिली होती नुसती! ज्या लोकांनीं तिला पूर्वी पाहिले होतें ते आतां तिच्याकडे बघून हळहळायचे. पूर्वीच्या डौलदार शरीरयष्टीचें, तिच्या भारदस्त वर्तणुकीचे व गुणांचें गुणगान गावयाचे.

मी तें सर्व मुकाट्यानें ऐकायचा, आईकडे आदरयुक्त नजरेनें पाहायचा आणि पूर्ववत् जोमानें तिला जें पाहिजे असेल तें देण्याचा प्रयत्न करीत असायचा. कधीं तिच्याशीं प्रेमानें वागायचा, केव्हां अगदीं त्रास झाला तर तिच्यावर संतापायचा. त्या वेळीं पण तो संताप· म्हणजे आळवावर पडलेलें पाणीच होय! क्षणाभरांत मी 'आई' असें म्हणून हांक मारायचा. त्या वेळीं माझ्या मनांतील संताप कुठल्या कुठें दडी मारून फरारी झालेला असायचा.

माझ्याप्रमाणेंच माझ्या आईचें प्रेमहि माझ्यावर होतें. तिला दिवसभर दोन भावंड जरी दिसली नाहीत तरी चालत. पण पंडित तिच्या कुठें दृष्टिआड झाला तर तिला मुळींच चैन पडायची नाहीं! जेव्हां मी तिच्यापुढे जाई तेव्हां तिचा जीव माझ्याकडे पाहून घाबरा व्हावयाचा. ती गहिंवरून मला म्हणायची, 'माझ्या बाळा, तूं कुठे रे गेला होतास, मला एकटीला सोडून?' त्या वेळीं मी फार लहान होतों. माझ्या बुद्धीला विचारांची पोच नव्हती. मी म्हणायचा, 'मी तर येथेंच होतों, आंत देवळांत खेळायला गेलों होतों.'

आजकाल माझ्या आईची तब्येत दिवसेंदिवस खराब होऊं लागली. मी लहान होतों, तरी देखील कोल्हापुरांतील सर्व डॉक्टरांना आईची तब्येत दाखवून, औषध देत होतों. ते तिची प्रकृती तपासून तिला टॉनिकच्या बाटल्या

लिहून देत असत. इतके सर्व चालून देखील माझ्या आईला काडीइतकाहि गुण नव्हता! डॉक्टरच्या सांगण्याप्रमाणें वागायचें. औषधांत पैसा खर्च करायचा असा आमचा क्रम चालला होता. पण आमच्या घरांत कांही पैशाची खाण नव्हती. आतां मात्र आईहि औषधाला कंटाळली होती. ती म्हणायची, ' पंडित, आतां मला औषध वगैरे कांहींहि नको. तूं आपला गप्प बैस पाहूं.' पण मी तिची समजूत घालून डॉ. द्रवीडांचे औषध चालूंच ठेवलें होतें. त्यांना मी रोजची फी कमी करण्याबद्दल विनंती केली. थोडी कुरकूर करतच त्यांनीं फी थोडी कमी केली. माझ्या आईची डॉ. द्रविडांच्यावर फार श्रद्धा होती. तिला बरें वाटेनासें झालें म्हणजे, ती म्हणे ' पंडित, जा पाहूं त्या द्रविड डॉक्टरांच्याकडे. औषध घेऊन ये.' डॉक्टरांनीहि आईच्या बाबतींत सहानभूति दाखवून प्रयत्नांची पराकाष्ठा चालवली होती.

पण दिवसें दिवस आईची तब्येत जास्त खालवूं लागली. घरीं आई व मीच काय ते राहिलों होतों. आजीला आत्तांच पंढरपूरला जायचा पुळका आलेला होता. वडील व भाऊ हे तर तिला पहायलाच तयार नव्हते. मीच जेवणखाण सारें पहात होतों. आईची काळजी मीच वाहात होतो. आतां तिला संडासापर्यंत जाण्याची देखील ताकद नव्हती. नाइलाजानें तिला तो विधी घरांतच उरकावा लागे.

मला तिचे अलीकडचे हाल पहावेनात. तिचें दुःख पाहून माझ्या मनांत कांपरा भरायचा. काय हा प्रसंग? माझा तो लहान जीव. सगळ्या अडचणींना कशी बरें टक्कर देणार? तरीहि माझ्यापरी मी तिची पुष्कळ सुमजूत घालण्याचा प्रयत्न करीत असायचा. अखेर डॉक्टरांचें सांगणें धाब्यावर ठेवून तिला जें हवें असेल तें मी तिला देऊं लागलों. तिच्या सर्व इच्छा पुऱ्या करायच्या असे मी ठरवलें. पेढे, बर्फी, लाडू वगैरे पदार्थ यथेच्छ खाऊं घातले. मला तिच्या शेवटच्या मनीषा पूर्ण करायच्या होत्या!

मी माझ्या आईची सेवा अत्यंत सहृदयतेनें व निरपेक्षपणें करीत होतों. माझ्या प्रेमांध अंतःकरणाला आईच्या जीवनांत प्रवेश करूं लागलेल्या त्या चोरट्या काळाची चाहूल मी समजूं शकलों नाहीं. माझ्या "आईचें मरण" ही घटनाच माझ्या शब्दकोशांत आढळत नव्हती. माझ्या आईच्या आजाराबद्दल लोकांत पुष्कळ तऱ्हेची कुजबूज चालायची. लोकांच्या तोंडचे अशुभ साद-पडसाद माझ्या कानांवर पडायचे. पण मी त्यांच्याकडे पूर्णपणें डोळेझांक केली. मला ती गोष्टच मुळीं चुकीची वाटायची. माझें चिमुकलें मन मला म्हणायचें 'माझी आई मुळींच मरणार नाहीं!' मी अगदीं निर्धास्त होतो. माझी आई! माझी आई होती ती!!...

........पण ती काळ रात्र! आईला विलक्षण त्रास होऊं लागला. तिची अंतिम इच्छा होती; ती म्हणजे आपली

सून तिला पाहायची....तिला घरांत आलेली आदर्श गृहिणी ( गृहलक्ष्मी ) पाहायची होती. पण दैवलिखित कांहीं वेगळेंच ! तिच्या नशीबांत हें भाग्य नव्हतें ! तिनें शेवटपर्यंत एकाच गोष्टीचा ध्यास लावून घेऊन, संध्याकाळीं साडेसातच्या दरम्यान पंडिताला या जगांत उघडें टाकलें ! आभाळाहूनहि विस्तीर्ण असें ' मातेचें कृपाछत्र ' नाहींसें होऊन पंडित पोरका झाला ! आकाश फाटलं गेलं ! दूरवरून कोठून तरी गाण्याचे पडसाद कानावर ऐकू येत होते. सुंदर आवाजांत तें गाणें म्हटलें जात होतें—

" होतीस माते, कशी ना कशी ।
पडून मम गृहीं ते ॥
वाटे मम आधार पर्वत सागरातें ।"

◊ ◊ ◊

# आणखी थोडेसे

आजचे माझें हें तिसरें पुस्तक प्रसिद्ध होत आहे. आजवरच्या दोन पुस्तकाप्रमाणेंच याहि पुस्तकाने वाचकांची कांहीं सात्त्विक करमणूक होईल अशी मी आशा करतों. आज जवळ जवळ तीन वर्षांपूर्वी मी माझ्या 'आई' या पुस्तकाचा पहिला भाग आपणांपुढें सादर केला. सदरहू पुस्तकाचें अनेक वाचकांनी यथोचित स्वागत करून तसं मला पत्रांनीं व प्रत्यक्ष भेटून निवेदन केलें. माझ्या पत्रकार मित्रांनींहि चांगले अभिप्राय दिले. खुद्द आमच्या कोल्हापुरांतील एक साप्ताहिक चालविणाऱ्या संपादकांनीं माझें पुस्तक वाचून त्याची 'वाहवा' केली व म्हणाले, 'गुरव, तुम्ही आमच्या संपादक मंडळांत काम करायला याल का?' त्यांना 'पाहूं, विचार करून काय तें कळवतो' असें सांगितले. पण पुढें माझ्या पाठीशीं असलेल्या इतर कामांतून तें कांहीं मला जमलं नाहीं.

दुसरें पुस्तक 'श्री देवी त्र्यंबुलीची कथा' या पुस्तकाची योजना मी मनांतून फार पूर्वीपासूनच आंखून ठेवलेली होती. आणि त्यांत मी चांगलाच यशस्वी ठरलों. देवी त्र्यंबुलीच्या अनेक भक्तगणांनीं, ते 'सोप्या भाषेंत लिहिलेलें, आबाल वृद्धांपासून छोटया छबकड्यांपर्यंत सर्वांना सहजी समजू शकेल, असें सुंदर पुस्तक' म्हणून एकमुखाने प्रशंसा केली. अनेक वृत्तपत्रांनीं चांगलें स्वागत करून माझ्या वाङ्मयीन सेवेचा गौरव केला. गु. सी. स. सरपाटलानीं तर मी त्र्यंबुलीचें चरित्रपर पुस्तक काढायच्या खटपटींत आहे हें ऐकतांच, माझ्या विचारांना चालना दिली म्हणाले, 'त्र्यंबुलीच्या चरित्राबद्दल खालचा समाज अज्ञात असून त्यांच्यांत तें चरित्र जाणून घेण्याची उत्सुकता आहे.' आणि पुस्तक प्रसिद्धीच्या खटपटींत त्यांनींहि चांगलांच पुढाकार घेतला. अनेक लोकांच्या तोंडून त्या पुस्तकाचें कौतुक ऐकून मला केलेल्या श्रमाबद्दल धन्यता वाटली.

आणि त्यानंतर, त्र्यंबुलीच्या चरित्राच्या आनंदाच्या जोमांत मी आज तुम्हांपुढें माझें हें तिसरें पुस्तक 'आई, भा. २' घेऊन हजर होत आहे. दिवसाच्या चोवीस तासांतला एखादा तासच चुकून सुटत असेल कीं त्यावेळीं मी माझ्या आईला विसरलोंय ! माझ्या आईसाठीं मी नाना कष्ट सोसले आहेत. या देहाची पर्वाही ठेवलेली नाहीं. माझ्या आईचा माझ्या मनावरील पगडा मरणापर्यंत मुळींच हटायचा नाहीं—मी माझ्या आईच्या आठवणी कधीं विसरायचा नाहीं.

मी माझ्या आईच्या या आठवणी प्रसिद्ध करायचं ठरवलं त्या वेळीं आई जिवंत होती. एका प्रकाशनसंस्थेनं तें प्रसिद्धहि करायचं ठरवलं होतं. पण नंतर झालं काय कीं तो दुसऱ्या गांवचा धंदेवाईक इसम दुकान दुसऱ्यास विकून येथून निघूनच गेला. आणि त्या वेळीं तोंडाशीं आलेला प्रसिद्धीचा योग हटला गेला.

मी त्या वेळींच आईला म्हणालों होतो, ' आई, मी तुझ्या जीवनांतील कांहीं सुंदर आठवणी प्रसिद्ध करणार आहे. त्या वेळीं ती म्हणाली, ' हं, कांहीं तरीच नको बोलूं पंडित ! ' त्या वेळचं तिचं तें बोलणं कांहीं अंशीं खरंहि होतं. मी लिहूं शकेन असं तिला मुळींच वाटत नव्हतं. त्या मुळेंच तिनं वरील उद्गार काढले. पण मी मात्र निश्चय केला कीं आज ना उद्यां केव्हां तरी हें पुस्तक प्रसिद्ध करायचंच.

माझा निश्चय आज पूर्ण होत आहे. या गोष्टींन मी आनंदलों आहे-माझं मन बहरून गेलं आहे-फुलून गेलं आहे. माझ्या आईनं मला जन्म दिला, ती माझ्या कर्तृत्वाचं कौतुक पहायला आज जरी जिवंत नसली तरी, तिचा मृत आत्मा माझ्या या कौतुकानं भारावेल, त्यालाहि कृतकृत्य झाल्याचा आनंद प्राप्त होईल हें निश्चित !

माझ्या आईनं माझ्यावर अमाप प्रेम केलं होतं. तळहातावरच्या फोडाप्रमाणं मला जपलं होतं. क्षुल्लक गोष्टींत जरी मी नकार दर्शविला तरी तिनं ती गोष्ट मी केल्याशिवाय स्वतः मुळींच केली नाहीं. उदाहरणार्थ-मी जेवण तयार केलेलं असावं, ताटांत वाढून घेतलेलं असावं, माझ्या पानांत मी थोडे थोडे पदार्थ घेतलेले असावेत. ते पदार्थ कमी दिसतांच ती म्हणायची ' पंडित, तूं एवढंसच कां घेतलंस वाढून ? '

मी म्हणायचा ' मला भूक नाही. '

' कांहींतरीच खोटं नको बोलूंस. घे पाहूं त्यांतला आणखीन् भात. ' मी ' नको ' असं म्हणायचा. पण तें तिला कुठचं पटायला ? ती म्हणायची, ' पहा हं पंडित, मला काय तुझं रोजचं खाणं ठाऊक नाही ? घे पाहूं आंणि जरा भात. नाहींतर मलाहि जेवायलाच नको.'

अशा वेळेला मी जर हट्ट केला तर असं व्हायचं की ती मुळींच जेवायची नाहीं. असं कितीतरी वेळेला व्हायचं. मी जरी मोठा झालों

होतों तरी माझं मन माझ्या भावना संकुचित होत्या. मी आणि माझी आई यापलीकडे कुठं जग असेल याची मला कल्पना नव्हती. एवढंच काय पण माझे वडील, भावंड यांचीही मला कांही जाणीव नव्हती ! ती फक्त जगाच्या दृष्टीनं आहेत. यापलीकडे निदान त्या वेळेत तरी कांही संबंध आलेला नव्हता !

आणि एके दिवशी माझ्या आईनं माझा कायमचा निरोप घेतला. माझ्यावर जीवाभावानं प्रेम करणारी माझी आई मला सोडून निघून गेली. मला कांही सुचत नव्हतं माझ्या नजरेसमोर सतत माझी आईच खेळत होती.

आईच्या निधनानंतर वडील, भावंडें घरी आली होतीं. आजीहि परतली होती. सारी एकत्र झालों होतों, ती माझ्यावर प्रेम करत असतील पण त्यांचं प्रेम माझ्या आईचं प्रेम नाही, ही रुखरुख माझ्या मनाला आजही जाणवल्याखेरीज राहात नाहीं. असं म्हणून मी त्यांच्या प्रेमाचा अनादर मुळींच करत नाहीं. तर माझ्या अंतःकरणांतील आवाज आपल्या-पुढं सांगत आहे.

माझ्या आईला वारल्याचा तिसरा दिवस होता. सकाळीच रक्षा विसर्जन करून माणसें आली होतीं. दिवस गेला होता. रात्रीचं जेवण बरांत चाललं होतं जेवण तयार झालेवर सर्वांना जेवायला बोलावलं; मी म्हणालों 'मला आतां जेवण नको' मला एक दोन वेळ हांक मारून जेवण्याबद्दल विचारण्यात आलं मी नकारच दर्शविला. सारी आंत बसून जेऊं लागली.

मी बाहेरील खोलीत अंथरुणांत झोपलो होतों. पण मला झोंप कुठली ? माझे डोळे झाले, मी ओक्साबोक्सी रडूं लागलों होतो. माझं दुःख अनावर झालं होतं. माझ्यासाठी स्वतःहि उपाशी राहणारी, मी कमी

९५८४३

खाल्लं म्हणून हट्टानं मला आणखीन खायला लावणारी ती माझी आई निघून गेल्याचं खरंखरं दु:ख मला आतां जाणवलं होतं. मी माझ्या आईला नेणाऱ्या त्या क्रूर दैवाला आळवित होतों. 'माझ्या आईला जिकडं नेलस तिकडं मला ने ना ?' आणि आईला म्हणत होतों, 'आई, तुझ्या या लाडक्याला एकटं टाकून तुला जाववलं तरी कसं ? मला विसरलीस ? '

मी माझ्या आया आज अनेक निर्माण केल्या आहेत. जिथं जातों तिथल्या स्त्रीला आईच्या भावनेनं लेखून लीन बनतो. बाबूरावांच्या घरांतली सारी मंडळी मला मुलाप्रमाणं मानतात. माझ्या मनाचं दु:ख कमी करण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यांनी आपल्यांतीलच एक मानून घेतलं आहे मला मीहि त्यांच्यांत आई, ताई' बापू, काका ( बापूचे वडिल ) या नावांनंच त्यांना बोलवतो. माझं त्यांच्यांत कांहीं अंशीं का होईना दु:ख नाहीसं होतं. मी त्यांच्यांत रममाण होतो. हट्टानं हवं नको तें मागतो, खातो. किंबहुना ते घर आज माझ्या मन:शांतीचं एकमेव ठिकाण ठरून गेलंय. पण अशा कांही वेळा येतात कां त्या वेळीं, मला माझं दु:ख आवरतां येत नाहीं. मी मुकाट एका बाजूला जातो. रडून रडून मन रिकामं करतो, माझ्या आईला विनवतो, 'आई, अजूनही मला तुझ्याकडे नाहीं ना बोलावत ? '

त्यामुळे झालंय काय की, मी कुठलीहि गोष्ट 'मृत्यूला आव्हान देऊन करतो.' मी ज्या वेळी राजकीय चळवळींत भाग घेतो, पंचगंगेच्या महापुरांत पोहायला पडतो, त्या वेळी माझे अनेक मित्र न जाण्याबद्दल सुचवतात, सायकल प्रवासाला बाहेर पडतो त्या वेळींहि असेच अनेकजण मला सांगतात. पण मला त्यांचं म्हणणं मुळींच पटत नाहीं. मी माझ्या मनाचं दु:ख विसरण्यासाठींच इतका व्याप वाढवला आहे. दारूचं व्यसन

फार फार वाईट असं आपण म्हणत असतो. पण ती पिणारा माणूस ती प्यावी म्हणून मुळींच पीत नसतो, तर आपल्याला असणाऱ्या क्लेशांचा विसर पडावा, श्रमांचा ताण नाहींसा व्हावा म्हणूनच तो ती पीत असतो. तद्वतच मलाहि हे एक व्यसनच लागले आहे. मी पोहण्यांत अनेक विक्रम प्रस्थापित केले असून सायकल प्रवासांतहि बरींच प्रगति केलेली आहे. राजकारणांत भाग घेऊन जेल यात्राहि पार पाडली आहे. परवांच मारलेली रायगड, प्रतापगड, वाई, पांचगणी ही पांचशें मैलांची ट्रिप अजूनही कोल्हापुरातील लोकांचा चर्चेचा विषय आहे. आणि आतां पुढील दोन-तीन महिन्यांत 'दिल्ली–आग्रा' ट्रिपला बाहेर पडणार आहे.

माझे अनेक चहाते, मित्र आणि आदरणीय व्यक्ति माझ्यावरचा कृपालोभ सदैव असाच ठेवून मला माझ्या कार्यांत शक्यतो उमेद द्यायचा प्रयत्न करतील अशी आशा बाळगून मी इथपर लांबत चाललेले निवेदन पुरे करतो.

कोल्हापूर,.
ता. ३०।११।१९५५

— पंडित गुरव

९६४५३

# आईस–

प्राणी आई शनिवार ता. ११-१-१९४९ इ. रोजी सायंकाळी सात वाजतां वारली. त्यानंतर दुसरे दिवशी खिन्न मनानें बसलो असतांना सुचलेले विचार–

होतीस माते काशि ना कशी पडून गृहीते ।
मम वाटे आधार पर्वत सागराते ॥
परि जगी गेलीस सोडुनी अनवाणी मला ।
तुजविना कोण मम साहिल मनिषा बल-बला ॥ १ ॥

मम सत्प्रेमाचा एक वृक्ष जगी उरला ।
परि त्याचाहि सर्व इलाज हरलेला ॥
तू पडून का होईना होतीस घरी ।
तव मम घर ते भासे सुवर्ण नगरी ॥ २ ॥

परि आता वाटे सर्व–सर्व सूने ।
मम इच्छा तूज एक असे सांगणें ॥
जो आला जगी तो गमे कधि ना कधी ।
हे आहे जगी सर्वेचिया सिद्धी ॥ ३ ॥

परि अजुनि मी अज्ञान बालक तो ।
नाही पुरता व्यवहार पोच तो ॥
हे सर्व ज्ञान मज हस्त करतांते ।
तो बरी तरी हा वृक्ष राहू दे ॥ ४ ।

मम इच्छा तुज आणि एक सांगणे ।
या शिशुकरितां घाल देवापाशी सांगणे ॥
मम प्राण सखा पति असे वठलेला ।
त्याची घडो छाया मम बालकानला ॥ ५ ।

दे, दे माते प्रेमे शुभाशिर्वादाते ।
ही अज्ञान त्रिकूट बाले वंदताते ॥
तू जीवे असतां मी केले जे अपराध ते ।
करुनी क्षम्य वद तू शुभाशिर्वादाते ॥ ६ ।

१२–१–१९४९
कोल्हापूर.

ति. मातेच्या चरणी सादर श्रद्धांजली.

IRBF-0116453
IRBK-0116453